# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०५/२००८.** **दिनांक १५.०४.२००८**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे मंगळवार दिनांक १५ एप्रिल, २००८ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा. नं. एसएसएस -वशी-०४- ५३१५-२००८, दि.०९.०४.२००८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. परंतू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, उपस्थित राहू शकत नसल्याने सदरहू सभा मंगळवार दिनांक १५ एप्रिल, २००८ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. उपाध्यक्ष श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष | ०२. | मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव |
| ०३ | मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे | ०४. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०५. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | ०६. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय |
| ०७. | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | | |

मा.श्री.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती नसल्याने अर्धा तास मा.सदस्यांची वाट पाहून नंतर दुपारी १०.३० वाजता सभेचे कामकाज मा.उपाध्यक्ष श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष, मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील,श्री पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.श्री. रमाकान्त गणेश कर्णिक मा.कॅप्टन सुरेश वासूदेवा मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री समि खतीब, यांनी पत्र व फॅक्सद्वारे कळविले आहे, त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

श्रीरामनवमी उत्सव-२००८ नुकताच पार पडलेला आहे. सदरहू उत्सवात मोठ्या प्रमाणावर पालख्या शिर्डीत दाखल झाल्या, संस्थानने आरतीचे वेळात बदल केल्याने मोठ्या प्रमाणात भक्तांना श्रीसाईबाबांचे दर्शन घेता आले. श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली असतांनाही मा.कार्यकारी अधिकारी यांनी योग्य प्रकारे नियोजन करुन गर्दी नियंत्रणात ठेवली, त्यामूळे गर्दी असूनही दर्शनलाईन शिर्डी गावात गेली नाही व मा.कार्यकारी अधिकारी अहोरात्र मंदिर परिसरात थांबून भक्तांना चांगल्या प्रकारे दर्शन सुविधा उपलब्ध करुन दिल्या त्याबद्दल मा.कार्यकारी अधिकारी यांचे विश्वस्तमंडळाने आभार मानले. सर्व प्रशासकीय अधिकारी यांनी मा.कार्यकारी अधिकारी यांचेप्रमाणे वेळोवेळी गर्दीचेवेळी परिसरात फिरुन भक्तांच्या अडचणी सोडवून त्यांच्या सोयीत सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा. तसेच येथून पूढे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भक्तांसाठी महिनाभर कोणते काम केले याचा अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेत न चुकता सादर करावा. तसेच गर्दीचे तसेच उत्सव काळात भक्तांना बसण्यासाठी तसेच थांबणेसाठी धर्मशाळा परिसरातील बगीचा २४ तास उघडा ठेवण्यात यावा.

**विषय नं.०१** **दिनांक १६.०३.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निर्णय क्र.३२०** दिनांक १६.०३.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र. २११ (०४)** अन्वये श्रीसाईसिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट,शिर्डी यांनी सन २००७ मध्ये झालेल्या सामुदायीक विवाह सोहळ्याचा खर्च सर्वश्री मा.विश्वस्त श्री.पांडूरंग गमाजी अभंग व श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी तपासून पहावा व याबाबत धोरणात्मक निर्णयासाठी आपला अहवाल आठ दिवसात सादर करावा असे ठरले होते.

परंतु श्रीसाईसिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट,शिर्डी यांनी खर्चाची बीले सादर न करता कोटेशन्स सादर केलेले असल्याने या सामुदायिक विवाह सोहळयास आर्थिक मदत देणेकामी मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष, मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांची समिती नेमण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**(०२) <u>निर्णय क्र.२१४ (०८) मध्ये शेवटचा परिच्छेद-</u>**

उपरोक्त प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून सदरचे आवश्यक साहित्य संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांना दाखवून त्यांचे शिफारशीनुसार उर्वरित साहित्य नामांकित कंपन्यांचे स्विकारणेत यावे असे ठरले. त्यानुसार अ.नं.१,४,५,७,९,१०,१३,१४ इत्यादी साहित्य निम्नतम दरानुसार, अ.नं.२,११,१६,१८ हे साहित्य संबधित डॉक्टरांनी शिफारस केल्यानुसार, अ.नं.०३ करीता एकच कोटेशन्स प्राप्त झालेले असल्याने ते स्विकारणेत यावे, तसेच अ.नं.०६ व ०८ हे नामांकित कंपन्यांकडून खरेदी करण्यात यावे, अ.१२ व १५ करीता कोणत्याही कोटेशन्ससादरकर्त्यांचे दर प्राप्त झालेले नसल्याने याकामी

फेर कोटेशन्स मागविण्यात यावे, अ.न.१७ ची आवश्यकता नसल्याने ते खरेदी करण्यात येऊ नये. उपरोक्त शिफारसीनुसार सदरचे खरेदीकामी रु.३,८०,८२४.४० यचे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**<u>याऐवजी</u>**

उपरोक्त प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून सदरचे आवश्यक साहित्य संबंधित वापर करणा -या डॉक्टरांना दाखवून त्यांचे शिफारशीनुसार उर्वरित साहित्य नामांकित कंपन्यांचे स्विकारणेत यावे असे ठरले. त्यानुसार अ.नं.१,४,५,७,९,१०,१३,१४ हे साहित्य निम्नतम दरानुसार, अ.नं.२,११,१६,१८ हे साहित्य संबधित वापरणारे डॉक्टरांनी शिफारस केल्यानुसार अ.नं.०३ करीता फकत एकच कोटेशन्स प्राप्त झालेले आहे ते स्विकारणेत यावे, **अ.नं.०६ व ०८ हे नामांकित कंपनी मे.जनक हेल्थ केअर प्रा.लि.मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात यावे.** अ.१२ व १५ करीता कोणाचेच दर प्राप्त झालेले नाहीत ते स्वतंत्र कोटेशन्स मागवून आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात यावे व अ.न.१७ ची आवश्यकता नसल्याने ते खरेदी करण्यात येऊ नये. उपरोक्तप्रमाणे सदरचे खरेदीस एकूण रु.३,८०,८२४.४० इतक्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०३) <u>निर्णय क्र. २६४ मधील शेवटचा परिच्छेद-</u>**

"तसेच त्यांचे दुरुस्तीकरिता आवश्यक असणारे स्पेअरपार्टस् बाजारात मिळत नाहीत त्यामुळे सदर टि.व्ही. स्टोअरमध्ये पडून आहे. असे खालीलप्रमाणे टि.व्ही.ची अभिलेखा विभागामार्फत लिलावाने विक्री करणेस तसेच लिलावाने विक्री झालेल्या टि.व्ही.ची नोंद ध्वनीक्षेपन विभागाच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली."

**<u>याऐवजी</u>**

"तसेच त्यांचे दुरुस्तीकरिता आवश्यक असणारे स्पेअरपार्टस् बाजारात मिळत नाहीत त्यामुळे सदर टि.व्ही. स्टोअरमध्ये पडून आहे. असे खालीलप्रमाणे टि.व्ही.ची अभिलेखा, ध्वनीक्षेपन व सी.सी.टी.व्ही विभागामार्फत कोटेशन मागणी करुन उच्चतम दराने विक्री करणेस तसेच विक्री झालेल्या टि.व्ही.ची नोंद ध्वनीक्षेपन विभागाच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यात यावे,असें ठरलें. "

(कार्यवाही-ध्वनीक्षपन विभागप्रमुख/अधिक्षक,अभिलेखाकक्ष)

**(०४) <u>निर्णय क्र. २७२ मधील शेवटचा परिच्छेद-</u>**

"धर्मशाळा विभागामार्फत सन १९९९ साली भक्तांना रुममध्ये बसण्यासाठी निलकमल कंपनीच्या प्लॉस्टिक खुर्च्या संस्थानचे भांडार विभागामधून व ऑफिस कर्मचाऱ्यांकरीता जून्या लाकडी खुर्च्या चौकशी व निवासस्थान कार्यालयातून आणलेल्या होत्या. सदर खुर्च्या रुम /कँटीन इत्यादी ठिकाणी नेहमीच्या वापराने चिरा पडून /पाय तूटून खराब झालेल्या आहेत. अशा खालीलप्रमाणे खराब निकामी झालेल्या प्लॉस्टिक खुर्च्या भक्तांना वापरण्यास योग्य नसल्याने त्याची अभिलेखा विभागामार्फत लिलावाने विक्री करणेस तसेच लिलावाने विक्री झालेल्या साहित्याची नोंद धर्मशाळा विभागाच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली."

**<u>याऐवजी</u>**

"धर्मशाळा विभागामार्फत सन १९९९ साली भक्तांना रुममध्ये बसण्यासाठी निलकमल कंपनीच्या प्लॉस्टिक खुर्च्या संस्थानचे भांडार विभागामधून व ऑफिस कर्मचाऱ्यांकरीता जून्या लाकडी खुर्च्या चौकशी व निवासस्थान कार्यालयातून आणलेल्या होत्या. सदर खुर्च्या रुम /कँटीन इत्यादी ठिकाणी नेहमीच्या वापराने चिरा पडून /पाय तूटून खराब झालेल्या आहेत. अशा खालीलप्रमाणे खराब निकामी झालेल्या प्लॉस्टिक खुर्च्या भक्तांना वापरण्यास योग्य नसल्याने त्याची धर्मशाळा व अभिलेख विभागामार्फत कोटेशन मागणी करुन उच्चतम दराने विक्री करणेस तसेच विक्री झालेल्या साहित्याची नोंद धर्मशाळा विभागाच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली."

(कार्यवाही-अभिलेखाकक्ष/धर्मशाळा विभागप्रमुख)

**(०५) <u>निर्णय क्र. ३०१ मधील शेवटचा परिच्छेद-</u>**

"सध्या बाजारात यंत्रणा उपकरणे चिनी बनावटीचे कमी दरात मिळतात परंतू दिर्घ काळ टिकत नाहीत अथवा दुरुस्ती करुनसुध्दा ते पूर्ण क्षमतेने काम देत नाहीत. त्यामूळे असे मटेरिअल ध्वनिक्षेपण विभागाचे स्टोअरमध्ये पडून आहे. असे खालीलप्रमाणे खराब व निकामी झालेले मटेरिअल वापरण्यास योग्य नसल्याने त्याची अभिलेखा विभागामार्फत विक्री करणेस तसेच लिलावाने विक्री झालेल्या साहित्याची नोंद ध्वनीक्षेपन विभागाच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. "

**याऐवजी**

"सध्या बाजारात यंत्रणा उपकरणे चिनी बनावटीचे कमी दरात मिळतात परंतू दिर्घ काळ टिकत नाहीत अथवा दुरुस्ती करुनसुध्दा ते पूर्ण क्षमतेने काम देत नाहीत. त्यामूळे असे मटेरिअल ध्वनिक्षेपण विभागाचे स्टोअरमध्ये पडून आहे. असे खालीलप्रमाणे खराब व निकामी झालेले मटेरिअल वापरण्यास योग्य नसल्याने त्याची अभिलेखा, ध्वनीक्षेपन व सी.सी.टी.व्ही विभागामार्फत कोटेशन्स मागवून उच्चतम दराने विक्री करणेस तसेच विक्री झालेल्या साहित्याची नोंद ध्वनीक्षेपन विभागाच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यात यावी असें ठरले. "

(कार्यवाही-ध्वनीक्षपन विभागप्रमुख/अधिक्षक,अभिलेखाकक्ष)

**विषय नं.०२** **०१.(अ) माहे मार्च- २००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**
**(ब) माहे मार्च- २००८ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.३२१** (१)माहे मार्च- २००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह देणगी एकूण रु. ६,२५,०६,४६१., माहे मार्च-२००८ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये १,७७,५४८/- चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटमध्ये माहे फेब्रुवारी,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.३२१** **(२)** माहे फेब्रुवारी,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलत रु.२३,१८,३४५/- चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयात माहे मार्च,२००८ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.३२१** **(३)** माहे मार्च-२००८ मध्ये श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या रुपये ४४,५३,७१८/- सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०४. साईनाथ रुग्णालयातील गरीब रुग्णांना माहे मार्च,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३२१** **(४)** माहे मार्च-२००८ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये ६१,१३४/- बाह्य रुग्ण रु.६१,००१/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५६,४५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली

**०५. माहे मार्च,२००८ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३२१ (५)** माहे मार्च-२००८ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ३६०७७ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३२१ (६)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली व तक्ता **अ** मधील नवीन प्रसादालय इमारत अंतर्गत सजावट करणे कामाससाठी ठेकेदार मे.सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजींग प्रा.लि.नाशिक यांना काम पुर्ण करण्यासाठी दिनांक ३०.०४.२००८ अखेरपर्यन्त मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३२१ (७)** माहे मार्च-२००८ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०३** **नवीन श्रीसाईप्रसादालयातील सोलर कुकींग यंत्रणा उभारणीकामी आलेल्या निविदा (दरपत्रके) उघडून चर्चा/ वाघाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३२२** नवीन श्रीसाईप्रसादालयाकरीता सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणी व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,३६,००,०००/- चे खर्चास तसेच वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मा.व्यवस्थापन समिती दि.०६.०१.२००८ चे सभेतील निर्णय क्र.५४ नुसार मान्यता मिळालेली होती. त्यानुसार वृत्तपत्रातील जाहिरातीप्रमाणे ३ एजन्सींनी निविदा खरेदी केलेल्या होत्या.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| ०१. | मे.सुप्रिम रे सोलर सिस्टीम्स | पुणे |
| ०२. | मे.शारदा इनव्हेंशन | नाशिक |

| | | |
|---|---|---|
| ०३. | मे.गढीया सोलर सिस्टीम्स प्रा.लि. | बलसाड (गुजरात) |

वरील पैकी अ.नं.२ व ३ या २ एजन्सींनी दरपत्रक सादर केलेले होते. संस्थान नियमानुसार कमीत कमी ३ दरपत्रक गरजेचे आहे. दोन एजन्सींनी वेगवेगळया डीश साईजचे दरपत्रक सादर केलेले असल्याचे आढळून आले आहे. तसेच निविदा फॉर्ममध्ये अन्य तांत्रिक त्रुटी आढळून आल्याने मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०.०२.२००८ मध्ये फेरनिविदा मागविणेबाबत निर्णय झालेला आहे. नवीन साईप्रसादालयाकरिता उभारण्यात येणाऱ्या कुकींग यंत्रणा अद्यायाबत व दोष रहीत असावी म्हणून मा.श्री.अजित के. गुप्ता, ॲडव्हायझर नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. त्याकामी मा.व्यवस्थापन समिती सदस्य, संस्थान अधिकारी व मा.श्री.अजित के. गुप्ता, ॲडव्हायझर नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांची संयुक्त सभा घेण्यासाठी नवी दिल्ली येथे जाणेस मान्यता देण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समिती दि.२०.०१.२००८ चे सभेतील निर्णय क्र.१४३ (क) नुसार दि.२७.०१.२००८ रोजी उर्जा मंत्रालय, नवी दिल्ली येथे मेडाचे अधिकारी, मा.व्यवस्थापन समिती सदस्य व संस्थान अधिकारी यांची सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी सभा झालेली आहे. उर्जा मंत्रालय नवी दिल्ली व मेडा यांचे संयुक्तीक मार्गदर्शन व सल्ल्यानुसार नवीन श्रीसाईप्रसादालयाकरीता सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी निविदा तयार करण्यात आलेली आहे.

दि.०७.०३.२००८ चे मंजुर टिपणीनुसार सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द **करण्यात आली होती.** वृत्तपत्रातील जाहिरातीप्रमाणे ४ एजन्सींनी निविदा घेतलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| ०१ | मे.शारदा इनव्हेंशन | नाशिक |
| ०२ | क्लीक डेव्हलपमेंट | मुंबई |
| ०३ | मे.गढीया सोलर सिस्टीम्स प्रा.लि. | बलसाड (गुजरात) |
| ०४ | थर्मेक्स लिमीटेड | पुणे |

दि.२७.०३.२००८ रोजी मा.व्यवस्थापन समिती सदस्य मा.श्री.सुरेश वाबळे, मा.सौ.उर्मिलाताई जाधव, मा.श्री.अशोक खांबेकर यांचे उपस्थीतीत टेक्नीकल बीड निविदा उघडणेत आलेल्या आहेत. सदर टेक्नीकल बीडची मेडा, पुणे सोर उर्जा सल्लागार यांचेकडून तपासणी करण्यात आलेली असून सल्लागार यांनी वरील ४ निविदाधारक पात्र असल्याचे अहवालात नमूद केलेले आहे.

सल्लागार यांनी वरील चारही निविदाधारकांना पात्र ठरविलेले आहे तरी नविन नवीन श्रीसाईप्रसादालयातील सोलर कुकींग यंत्रणा उभारणीकामी आलेल्या निविदा (दरपत्रके) उघडून चर्चा/ वाघाटाघाटीने निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

उपरोक्तप्रमाणे निविदा/दरपत्रके उघडून चर्चा/वाटाघाटीव्दारे निर्णय घेणेपूर्वी निविदासादरकर्त्यांशी तांत्रिक बाबी विषयी सविस्तर चर्चा करुन अभिप्राय देणेसाठी सौज उर्जा क्षेत्रातील श्री सी.एम.देशपांडे, मॅनेजर सोलर, मेडा, पूणे व मा.श्री प्रा.ए.जी.ताकवले, माजी कुलगुरु शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर तसेच मा.प्रा.सौ.ए.एम.पाठक, पुणे विद्यापीठ एनर्जी विभागप्रमुख यांना आमंत्रित करणेत आलेले होते. त्यानुसार वरील तज्ञ सल्लागार यांनी ४ निविदा सादरकर्त्यांशी स्वतंत्रपणे व मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा केली असता चर्चेअंती खालीलप्रमाणे निदर्शनास आले.

०१) निविदेमध्ये १७००० व्यक्तीसाठी अन्न शिजविणेकामी ४२०० कि.ग्रॅम प्रति दिन स्टीमची निर्मिती क्षमता नमूद केलेली आहे. मात्र निविदासादरकर्त्यांनी टेक्नीकल बीडमध्ये स्टॅण्डर्ड सोलर रेडीएशननुसार सोलर प्रोजेक्टची डिझाईन केलेली होती. प्रत्यक्षात शिर्डीचे भौगोलिकदृष्ट्या सोलर रेडीयशन पूणे, निफाड सारखे असल्याने प्रत्यक्षात मिळणाऱ्या स्टिम जनरेशनमध्ये तफावत आढळून आली.

०२) सध्याचे निविदा/दरपत्रकामध्ये सोलर स्टीम साठविणेकामी यंत्रणेचा विचार केलेला नाही प्रसादालयामध्ये अन्न शिजविण्याचे काम सकाळी ७.००वाजेपासून सुरु होते. मात्र सोलर स्टिम सकाळी ११.०० वाजेच्या पूढे तयार होते त्यामूळे सदर सोलर यंत्रणेचा वापर ठराविक काळापूरताच होत असल्याने प्रसादालयाचे गरजेनुसार जास्तीजास्त सोलर स्टिम उपलब्ध व्हावी म्हणून सौर उर्जा यंत्रणा उभारणी करतांना स्टिम साठविणेकामी यंत्रणा असणे आवश्यक आहे.

सबब सर्व निविदासादरकर्त्यांना लेखक ए.मनी यांचे "सोलर रेडिऐशन" या पूस्तकाच्या जंत्रीमध्ये पूणे व निफाड समोर दर्शविल्याप्रमाणे कॅल्क्यूलेशन करुन तसेच स्टिम स्टोअरेज यंत्रणा उभारणीचा अंतर्भाव करुन आठ दिवसात फेरदरपत्रके व डिझाईन सादर करण्यास सांगणेत आले.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.०४** **सर्व्हे नं. १२४/०१अ.पै.मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३२३** दि.२४.०२.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१९० अन्वये सर्व्हे नं. १२४ पै. मधिल मध्यवर्ती भांडार इमारतीचे परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी विहीत पद्धतीने

कोटेशन्स मागवुन काम करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,०४,७१०.०० मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार दि.१३/०३/२००८ रोजीचे दै.लोकमत आणि दै.सामना, अहमदनगर या वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. याकामी निवीदा विक्रिचा कालावधी दि.१२.०३.२००८ ते दि.२५.०३.२००८ पर्यंत ठेवण्यात आला होता.आणि दि.२८.०३.२००८ अखेर सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत देण्यात आली होती.

वरीलप्रमाणे शिर्डी येथिल कार्यालयातून एकुण सहा निविदाधारकांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या होत्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री. एस.एन. गुंजेगावकर ,निघोज,ता.राहाता |
| ०२ | श्री. डी.जी.गंदाल,नेवासा |
| ०३ | मे.श्री.असोशिएटस,नाशिक |
| ०४ | श्री वाय.एस.पाटील,कोपरगाव |
| ०५ | श्री.एन.एस.हडप,देवळाली (प्रवरा) ता.राहुरी |
| ०६ | श्री. ए.एल.गायकवाड ,अहमदनगर |

यापैकी खालील एकूण सहा निविदाधारकांनी सिलबंद निविदा दिलेल्या मूदतीत सादर केल्या आहेत.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री. डी.जी.गंदाल,नेवासा |
| ०२ | मे.श्री.असोशिएटस,नाशिक |
| ०३ | श्री. एन.एस.हडप,देवळाली (प्रवरा) ता.राहुरी |
| ०४ | श्री. एस.एन.गुंजेगावकर ,निघोज,ता.राहाता |
| ०५ | श्री. वाय.एस.पाटिल,कोपरगाव |
| ०६ | श्री. ए.एल.गायकवाड ,अहमदनगर |

वरीलप्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या एकुण सहा निविदाधारकांचे सिलबंद लिफाफा क्र.०१ व लिफाफा क्र.०२ आजचे सभेपूढे उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. डी.जी.गंदाल,नेवासा | १०% कमी | १०% कमी |
| ०२ | मे.श्री.असोशिएटस,नाशिक | ७.५०% कमी | ९.५०% कमी |
| ०३ | श्री. एन.एस.हडप,देवळाली (प्रवरा) ता.राहुरी | ५.७३% कमी | ७.८३% कमी |
| ०४ | श्री. एस.एन.गुंजेगावकर, निघोज, ता.राहाता | ७.२% कमी | ९.२% कमी |
| ०५ | श्री. वाय.एस.पाटील,कोपरगाव | १०.९०% कमी | २०% कमी |
| ०६ | श्री. ए.एल.गायकवाड ,अहमदनगर | ६.३३% कमी | ६.३३% कमी |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. वाय.एस.पाटील,कोपरगाव यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०५** **सर्व्हे नं.५४,५५ येथील वाहन पार्कींग तारकुंपण करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ३२४** श्रीसाईबाबा संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.५४,५५ (पुनर्वसन व क्रिडांगण) या आरक्षीत असलेल्या जमिनी प्रसादालय परिसराचे उत्तर बाजूस असलेली लक्ष्मीनगर वसाहत स्थलांतरीत करणेसाठी खरेदी केलेली आहे. तथापी सदरहू प्रकल्पास विलंब लागणार असल्याने तुर्त याठिकाणी भक्तांचे वाहन पार्किंग करण्याचे नियोजन आहे. भक्तांचे वाहन पार्किंग करणेसाठी संस्थानतर्फे प्रसादालय परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर व धर्मशाळा परिसर येथे पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच दोन तीन ठिकाणी खाजगी पार्किंग आहेत. परंतू सदरची पार्किंग व्यवस्था अपुरी पडत असल्याने बऱ्याच वेळेस साईभक्त त्यांचे वाहन नगर- मनमाड रोड, पिंपळवाडी रोडवर पार्किंग करतात, त्यामुळे वहातुकीला अडचण होते. याकरीता संस्थानने नव्याने खरेदी केलेल्या स.नं.५४,५५ पार्कींग व्यवस्था करणेकामी मुरुम टाकणे इरेगेशन चारीमध्ये नळ्या आर.सी.सी टाकणे याकामी येणारे अंदाजे रुपये ७५,०००.०० मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०७/२००७ चे सभेत नि.क्र.५९६ (१४) अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार तेथे आर.सी.सी.पाईप टाकून घेणेत आले आहे. सरदर क्षेत्रावर अतिक्रमण होऊ नये तसेच आजुबाजुने रहिवासी सदर ठिकाणी टॉयलेट करु नये याकरीता तारकंपाऊंड करणे गरजेचे आहे.

तसेच सदर क्षेत्रास सुरक्षिततेच्या दृष्टीने काटेरी तारेचे कुंपन करणेची आवश्कता असुन याकामी रुपये २,४९,१८८.०० मात्र खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४/०२/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १८८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. याकामी वर्तमान पत्रात

निविदा सूचना प्रसिध्द करुन को ऱ्या निविदा विक्रीची मूदत दिनांक १२/०३/२००८ ते दिनांक २५/०३/२००८ अखेर ठेवण्यात आली असून सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दिनांक २८/०३/२००८ अखेर ठेवण्यात आली. याकामी खालील ठेकेदार यांनी कोरी निविदा फॉर्म विकत घेतले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | ०३ | अमर मजुर बांधकाम सोसायटी, पांगरी |
| ०२ | मे. श्री. असोसिएटस, नाशिक | | |

वरील पैकी फक्त श्री संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज यांची एकच निविदा प्राप्त झाली . तरी प्राप्त झालेली निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडता येईल अथवा विहीत पद्धतीने मटेरीयल खरेदी करुन मजूर ठेकेदाराकडून खात्यामार्फत काम करुन घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या बाजारात स्टीलचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढलेले असून काम तातडीने करणे आवश्यक असल्याने आलेली निविदा उघडण्यात येऊन निविदासादरकर्ते श्री.संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज यांचेशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केली असता त्यांनी देऊ केलेल्या ५४.७७ % अधिक दराची म्हणजे रु.३,६७,३०८/-दरात कोणताही बदल न केल्याने त्यांची निविदा स्विकारणेत येऊन त्यांचेकडून काम करुन घेण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०६** **नविन श्री साईप्रसादालय व श्रींचे समाधी मंदिर परिसर या ठिकाणी पितळी अक्षरांचे फलक तयार करणेकामी आलेल्या कोटेशन्सवर निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३२५** श्रीसाईबाबा संस्थानचे नवीन श्री साई प्रसादालय व "श्री", चे समाधि मंदीर परीसरातील पवित्र वारसा असलेल्या इमारती आणि इतर प्रमुख ठिकाणांना मराठी व इंग्रजी ओतीव पितळी अक्षरांचे बोर्ड बसविणेसाठी दि.१०.०१.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे बैठकितील निर्णय क्र. ६१ अन्वये विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन पितळी अक्षरे तयार करुन घेणे व ती बसविणेसाठी एम.एस. शिटचे बोर्डस करणे इत्यादी कामासाठी येणाऱ्या योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार इकडील जा.क्र. २३७८/२००८ दि. १३/०२/२००८ रोजीचे पत्रान्वये खालील पुरवठाधारक यांचेकडून विहीत नमुन्यामध्ये दि. २१/०२/२००८ पुर्वी संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात पोहचतील अशा रितीने कोटेशन्स बोलविण्यात आले होते. तसेच उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही असे उपरोक्त पत्रात नमूद करण्यात आले होते.

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नांव | अ.नं. | कोटेशन धारकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | गोल्डन आर्टस, पुणे | ०५ | अंकुर न्युऑन, मुंबई |
| ०२ | भारत आर्ट वर्क्स, पुणे | ०६ | प्ले मेट सिस्टम्स, मुंबई |
| ०३ | महाराष्ट्र हार्डवेअर, पुणे | ०७ | पुजा स्टिल कार्पोरेशन, मुंबई |
| ०४ | रोहीणी मेटल प्रेसींग वर्क्स,पुणे | ०८ | जाधव एन्ग्रेव्हर्स, नाशिक |

उपरोक्त पैकी खालील चार पूरवठाधारकांनी कोटेशन्स सादर केलेले आहेत. त्यापैकी पुजा डिजीटल यांना इकडील विभागामार्फत पत्र देण्यात आलेले नव्हते पुजा डिजिटल ही पुजा स्टील कार्पो.यांची सिस्टर कन्सर्न आहे.प्राप्त झालेल्या कोटेशन्सचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | पुजा स्टिल कार्पोरेशन, मुंबई |
| ०२ | पुजा डिजीटल साईन ॲण्ड डिसप्ले आर्ट मुंबई |
| ०३ | अंकुर न्युऑन, मुंबई |
| ०४ | गोल्डन आर्टस, पुणे |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स दि. १८/०३/२००८ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | अक्षरांची उंची/ जाडी | दर रुपये प्रती अक्षर | मे. पुजा स्टिल कार्पोरेशन, मुंबई | पुजा डिजिटल, मुंबई | अंकुर न्युऑन, मुंबई | गोल्डन आर्टस, पुणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| ०१ | मराठी अक्षर | १२ इंची | प्रती अक्षर रुपये | ८,५८०.०० | ८,५८०.०० | १०,५००.०० | १२००.०० |
| ०२ | मराठी अक्षर | ०८ इंची | प्रती अक्षर रुपये | ५,८५०.०० | ५,८५०.०० | ६,५००.०० | ८००.०० |
| ०३ | मराठी अक्षर | ०६ इंची | प्रती अक्षर रुपये | ४,५५०.०० | ४,५५०.०० | ५,५००.०० | ६००.०० |
| ०४ | मराठी अक्षरांसाठी | १२ इंची | प्रती अक्षर रुपये | ४,५५०.०० | ४,५५०.०० | ५,७००.०० | ६००.०० |
| ०५ | काना /मात्रा/ऊकार | ०८ इंची | प्रती अक्षर रुपये | २,९००.०० | २,९००.०० | ३,५००.०० | ४००.०० |
| ०६ | वेलांटी/अनुस्वार इ.सह | ०६ इंची | प्रती अक्षर रुपये | २,६००.०० | २,६००.०० | ३०००.०० | ३००.०० |
| ०७ | इंग्रजी अक्षर Capital letter | १२ इंची | प्रती अक्षर रुपये | ७,८००.०० | ७,८००.०० | १०,०००.०० | १,२००.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | इंग्रजी अक्षर Capital letter | ०८ इंची | प्रती अक्षर रुपये | ५,२५०.०० | ५,२५०.०० | ८,०००.०० | ८००.०० |
| ०९ | इंग्रजी अक्षर Capital letter | ०६ इंची | प्रती अक्षर रुपये | ३,९००.०० | ३,९००.०० | ५,०००.०० | ६००.०० |
| १० | इंग्रजी अक्षर Small letter | १२ इंची | प्रती अक्षर रुपये | ४,६८०.०० | ४,६८०.०० | ५,०००.०० | १,२००.०० |
| ११ | इंग्रजी अक्षर Small letter | ०८ इंची | प्रती अक्षर रुपये | २,९१२.०० | २,९१२.०० | ४,०००.०० | ८००.०० |
| १२ | इंग्रजी अक्षर Small letter | ०६ इंची | प्रती अक्षर रुपये | २,१८४.०० | २,१८४.०० | ३०००.०० | ६००.०० |
| १३ | अक्षरे फिटींगसाठी २० गेज जाडीच्या पावडर कोटेड / काळ्या रंगाचे जी.आय. पत्र्याचे बोर्ड (१ इंची स्क्वे पाईपचे फ्रेमसह) | ५४ नग (आवश्कते नुसार वेगवेगळ्या आकारामध्ये) | प्रति चौ. फुट रुपये | २००.०० | २००.०० | ३५०.०० | २८०.०० |

उपरोक्त अनुक्रमे पुरवठाधारक यांनी देऊ केलेल्या दरानुसार खालीलप्रमाणे अंदाजे रक्कम दिसून येते.

| **अ.नं.** | **कोटेशन धारकाचे नांव** | **अंदाजे रक्कम रुपये** |
|---|---|---|
| ०१ | पुजा स्टिल कार्पोरेशन, मुंबई | २८,०१,०१०.०० |
| ०२ | पुजा डिजीटल मुंबई | २८,०१,०१०.०० |
| ०३ | अंकुर न्युऑन, मुंबई | ३५,९६,२००.०० |
| ०४ | गोल्डन आर्टस, पुणे | ०५,८५,५२०.०० |

अनुक्रमे पुरवठाधारक यांनी याव्यतिरिक्त खालील अटी शर्ती दर्शविल्या आहे.

**अ) मे. पुजा स्टिल कार्पोरेशन, मुंबई :-** (अटी व शर्ती )

०१ Vat ८% अधिक ४.०८% सर्व्हिस टॅक्स अतिरिक्त राहील

०२ पेमेंटच्या अटी व शर्ती करारनामा करतेवेळी ठरविण्यात येतिल.

०३ सदर दर १५ दिवसांसाठी असतील.

०४ मटेरीअल ठेवणेसाठी जागा संस्थानमार्फत देण्यात यावी.

०५ पाणी, रात्रीच्या दिव्यांची सोय, कामसाठी आवश्यक विद्युत पुरवठा संस्थान मार्फत देण्यात यावा.

०६ बोर्ड जागेवर फिटींग करण्यासाठी पहाडाची व्यवस्था संस्थानतर्फे विनामुल्य करण्यात यावी.

०७ या दरांमध्ये सिव्हील वर्क चा समावेश नाही ते याव्यवतिरिक्त राहील.

०८ सदर कामसाठी कामागारांना दोन खोल्या संस्थान मार्फत विनामुल्य देण्यात याव्यात.

**ब) पुजा डिजीटल , मुंबई :-** (अटी व शर्ती )

०१ Vat ८% अधिक ४.०८% सर्व्हिस टॅक्स अतिरिक्त राहील

०२ पेमेंटच्या अटी व शर्ती करारनामा करतेवेळी ठरविण्यात येतिल.

०३ सदर दर १५ दिवसांसाठी असतील.

०४ मटेरीअल ठेवणेसाठी जागा संस्थानमार्फत देण्यात यावी.

०५ पाणी, रात्रीच्या दिव्यांची सोय, कामसाठी आवश्यक विद्युत पुरवठा संस्थान मार्फत देण्यात यावा.

०६ बोर्ड जागेवर फिटींग करण्यासाठी पहाडाची व्यवस्था संस्थानतर्फे विनामुल्य करण्यात यावी.

०७ या दरांमध्ये सिव्हील वर्क चा समावेश नाही ते याव्यवतिरिक्त राहील.

०८ सदर कामसाठी कामागारांना दोन खोल्या संस्थान मार्फत विनामुल्य देण्यात याव्यात.

**क) अंकुर न्युऑन मुंबई :-**

सदर पुरवठाधारक यांनी कुठल्याही अटी व शर्ती कोटेशनमध्ये नमूद केलेल्या नाहीत.

**ड) गोल्डन आर्टस, पुणे :- (अटीव शर्ती ):-**

०१ पितळी अक्षर बोर्डसह फिटींगचे चार्जेस रुपये २५,०००.०० अतिरिक्त दिलेले आहेत.

टिप :- १. इकडील विभागामार्फत जी.आय. पत्रा २० गेजचा कळविला होता. तथापी पुरवठाधारक यांनी १८ गेजचा पत्र्याचा दर नमूद केलेले आहेत.

०२. आपले सदरचे पत्र मला दि. २९/०२/२००८ रोजी मिळाले म्हणून सदर कोटेशन पाठविण्यास विलंब झाला याची कृपया नोंद घ्यावी असे नमूद केले आहे.

०३. अक्षर मराठी उंची १२" जाडी ५० एम एम हाफ राऊंड अक्षर मराठी उंची ०८" जाडी ४० एम एम हाफ राऊंड अक्षर मराठी उंची ०६" जाडी ३० एम एम हाफ राऊंड असे नमूद केले आहे.

०४. पुरवठा धारक यांनी इंग्रजी अक्षरांसाठी Capital letter आणी Small letter याबाबत वेगवेगळे दर दिलेले नाहीत तथापी पुरवठाधारक यानी दि. २१/०३/२००८ रोजीचे फॅक्सव्दारे Capital आणि Small letter साठी एकच दर देऊ केले आहे.

दिनांक २१/०३/२००८ रोजीचे फॅक्सव्दारे पुरवठाधारक यांनी सदर कामासाठी १२.५०% व्हॅट अतिरिक्त आकारला जाईल असे नमूद केले आहे.

वरील प्रमाणे मे. गोल्डन आर्टस, पुणे यांचे दर निम्नत्तम असल्याचे दिसून येतात तथापी सदर काम हे मोठ्या रकमेचे असल्याने उपरोक्त चारही पूरवठाधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे. पुजा स्टिल कार्पोरेशन, मुंबई | २८,०१,०१०.०० | २५,२०,९०९.०० |
| ०२ | पुजा डिजीटल , मुंबई | २८,०१,०१०.०० | अनुपस्थित |
| ०३ | अंकुर न्युऑन मुंबई | ३५,९६,२००.०० | २८,७६,९६०.०० |
| ०४ | गोल्डन आर्टस, पुणे | ५,८५,५२०.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, गोल्डन आर्टस, पुणे यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०७** **साईउद्यान इमारत इं.मि.स्कूल पहिला मजला पॅसेज व दोन वर्ग खोल्या व साईनगर परिसरातील अे-१ कर्मचारी निवासस्थाने इमारतीचे जिन्याला वॉलपुट्टीकामी आलेल्या निविदा उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३२६** साईउद्यान इमारत, इं.मे.स्कूल पहिला माळा पॅसेज व दोन वर्ग खोल्या तसेच साईनगर पसिरातील ए-१ इमारतीचे जिन्याचे भिंतीला वॉलपुट्टी करणेकरीता येणारे अंदाजे रु ८,३५,६०१.३५ मात्रचे खर्चास व याकामी निविदा मागविणेस दि.१६.०३.२००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यता देणेत आली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्दकरुन कोरी निविदा फॉर्म विक्री दि. १९/०३/२००८ ते दि. २४/०३/२००८ या कालावधीत तसेच सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि. २६/०३/२००८ अखेर ठेवणेत आली होती.

त्यानुसार विहीत मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोरी निविदा फॉर्म विकत घेऊन विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | ॲक्वा केम, संगमनेर | ०३ | ओमसाई एंटरप्रायझेजस, पुणे |
| ०२ | मेहता ट्रेडींग एजन्सी, अ.नगर | | |

उपरोक्त ठेकेदारांचे प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांनी समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | ॲक्वा केम, संगमनेर | ५,१६,८७१.०० | ४,९१,०२७.०० |
| ०२ | ओमसाई एंटरप्रायझेजस, पुणे | ४,५३,९१८.०० | ४,४४,८४०.०० |
| ०३ | मेहता ट्रेडींग एजन्सी, अ.नगर | १०,७७,३६८.०० | १०,६०,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, ओमसाई एंटरप्रायझेजस, पुणे यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०८** **शांतीनिकेतन इमारत दुरुस्तीकरीता आलेल्या निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३२७** पिंपळवाडी रोड लगत साईभक्त श्री.आर.एच.शामदासानी यांनी सन २००० साली शांतिनिकेतन इमारत बांधली आहे. सदर इमारत बांधून पूर्ण झाल्यानंतर सन २००० साली संस्थानला देणगीदाखल दिली आहे. सदर इमारतीचे वॉटरप्रुफींग व इतर आवश्यक दुरुस्ती व रंगकाम करणेकामी आर्किटेक्ट मे.निकम पा.असो.श्रीरामपूर यांनी सन २००५-२००६ चे डी.एस. आर. दराने **रु. १४,८८,५७२.००** मात्र खर्चाचे ब्लॉक एस्टीमेट सादर केले होते. सदरचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता देण्यात आली असून, याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविनेस मान्यता देण्यात आलेली आहे.

आर्किटेक्ट मे.निकम पा.असो., श्रीरामपूर यांनी प्रचलित डि.एस.आर. २००७-२००८ चे दरानुसार रु. १६,७६,७३४.०० मात्र रकमेचे सविस्तर इस्टीमेट सादर केले आहे. प्रचलित दरानुसार एकूण रुपये १,८८,१६२.०० मात्र रक्कम मंजूर रकमेपेक्षा वाढत आहे.

श्री.रमेश शामदासानी, विश्वस्त, शामदासानी फाउंडेशन यांनी दि. १६/०३/२००७ चे पत्रान्वये सदर कामाचा खर्च देणगी दाखल करणेबाबत इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांना इकडील जा.नं. ५६२३ दि.०६/०४/२००७ चे पत्रान्वये याकामाचे एस्टीमेट ची प्रत देणेत आली होती. वेळोवेळी त्यांचेशी चर्चा करण्यात आली त्यांनी निर्णय कळवितो असे सांगितले. परंतू त्यांनी अद्यापपर्यंत त्यांचा निर्णय कळविलेला नाही .

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार याकामी वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन को ऱ्या निविदा विक्रीची मूदत दिनांक २५/०२/२००८ ते दिनांक २५/०३/२००८ अखेर ठेवण्यात

आली असून सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दिनांक ०२/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली. याकामी खालील ठेकेदार यांनी कोरी निविदा फॉर्म विकत घेतले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | ०३ | मे. आर.एल.भुतडा, कोपरगांव |
| ०२ | मे. श्री. असोशिएटस, नाशिक | | |

वरिल पैकी अ.नं. २ चे निवदाधारक मे. आर. एल.भुतडा यांचे व्यतिरिक्त इतर दोन निविदाधारक यांनी विहीत मूदतीत सिलंबल निविदा सादर केल्या असून, प्राप्त झालेले सिलबंद निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे. श्री. असोशिएटस, नाशिक | १५,०९,८५८.५५ | १५,०९,८५८.५५ |
| ०२ | श्री. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | १५,५२,१७६.०० | १५,५२,१७६.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. श्री.असोशिएटस, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०९** **नवीन कॅश व्हॅन खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३२८** दि.२४/०२/२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.२०२ अन्वये श्री साईबाबांचे मंदीरातील व परिसरातील दक्षिणापेटयामधुन एकत्रित जमा होणारी रक्कम मोजणीनंतर बॅकेत पोहच करणे तसेच सोने, परकीय चलन नेणे कामी एक नवीन कॅश व्हॅन खरेदी करणे आवश्यक असलेने या करीता टाटा कंपनीचे ४०७ मॉडेलची चेसी खरेदी करून बॉडी बिल्डर यांचेकडून आपणास आवश्यक आहे तशी (आपले मागणीनुसार) बॉडी बांधणी करून घेणे यासाठी अंदाजे रू.७,५०,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील निर्णयानुसार खालील प्रमाणे टाटा४०७ चेसी करीता टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/७७१/२००८ दि.१४/०३/२००८ ने तसेच बॉडी बांधणी करीता बॉडी बिल्डर यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/७७२/२००८ दि.१४/०३/२००८ ने कोटेशन बोलाविण्यात आली होती.

**अ) टाटा४०७ चेसी करीता अधिकृत डिलर**

०१) स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर
०२) स्टर्लिंग मोटर्स, नाशिक
०३) कांचन मोटर्स, नाशिक
०४) मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर

**ब) बॉडी बांधणी करीता बॉडी बिल्डर**

०१) इन-कोच बिल्डर्स, मुंबई
०२) आरको इंजिनिअर्स, पुणे.
०३) ॲन्थोनी गॅरेज प्रा.लि., नवी मुंबई
०४) त्रिमुर्ती मोटार बॉडी बिल्डर, मुंबई

वरील अधिकृत डिलर तसेच बॉडी बिल्डर पैकी खालील प्रमाणे तीन अधिकृत डिलर तसेच चार बॉडी बिल्डर यांचेकडून बंद कोटेशन प्राप्त झालेली आहेत.

**अ) टाटा४०७ चेसी करीता अधिकृत डिलर**

०१) स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर
०२) स्टर्लिंग मोटर्स, नाशिक
०३) मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर

**ब) बॉडी बांधणी करीता बॉडी बिल्डर**

०१) इन-कोच बिल्डर्स, मुंबई
०२) आरको इंजिनिअर्स, पुणे.
०३) ॲन्थोनी गॅरेज प्रा.लि., नवी मुंबई
०४) त्रिमुर्ती मोटार बॉडी बिल्डर, मुंबई

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**अ) टाटा४०७ चेसी करीता अधिकृत डिलर**

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ५,०२,२९३.०० |
| ०२ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक | ५,१९,०५०.०० |
| ०३ | मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | ५,०२,२९३.०० |

आजचे सभेत टाटा ४०७ चेसीज करीता उपस्थित अधिकृत डिलर स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर व शुभयान मोटर्स, अहमदनगर यांनी चेसिजची किंमत दिनांक ०१.०४.२००८ पासून वाढल्याने कोटेशन्समध्ये नमूद केलेल्या दरामध्ये चेसीज देण्यास असमर्थता दर्शविली. व त्यांनी चेसीजकरीता खालीलप्रमाणे नवीन दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ५,१९,०४६.०० | ४,९२,०४६.०० |
| ०२ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक | ५,१९,०५०.०० | अनुपस्थित |
| ०३ | मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | ५,१९,०४६.०० | ४,९४,०४६.०० |

**ब) बॉडी बांधणी करीता बॉडी बिल्डर**

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | इन-कोच बिल्डर्स, मुंबई | २,६८,८७५.०० | २,०१,०००.०० |
| ०२ | आरको इंजिनिअर्स, पुणे. | ३,०३,७५०.०० | २,६०,०००.०० |
| ०३ | ॲन्थोनी गॅरेज प्रा.लि., नवी मुंबई | २,०८,१२५.०० | १,९३,१२५.०० |
| ०४ | त्रिमुर्ती मोटार बॉडी बिल्डर, मुंबई | २,४६,९३७.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ) टाटा ४०७ चेसीजकरीता स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर व ब) बॉडी बांधणीकरीता ॲन्थोनी गॅरेज प्रा.लि. नवी मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा तसेच वाहन ताब्यात मिळालेनंतरच चेसीसची रक्कम आदा करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.१०** **Dat Drive खरेदी करणेकामी आलेल्या निविदा उघडून चर्चा तथा वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३२९** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ०८(२५) नुसार माहिती तंत्रज्ञान विभागातील मुख्य सर्व्हरवरील माहितीचा बॅकअप घेणेसाठी खालील तपशीलाप्रमाणे Dat Drive व IBM Tivoli सॉफ्टवेअर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ७,६३,५००/- + टॅक्सचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन, Dat Drive व IBM Tivoli सॉफ्टवेअर खरेदी करणेसाठी महाराष्ट्र टाईम्स, (मराठी) मुंबई आणि पुणे आवृत्ती या वर्तमान पत्रामध्ये जाहिरात व संस्थानचे वेबसाईटवर सिलबंद निविदा मागविणेसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सिलबंद निविदा संस्थानला सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक २५ मार्च, २००८ अखेर ठेवण्यात आलेली होती.

सदर जाहिरातीनुसार, खालील पुरवठादारांनी Dat Drive व IBM Tivoli सॉफ्टवेअरच्या दरपत्रकांबाबत सिलबंद निविदा दिलेल्या मुदतीत संस्थानला सादर केलेल्या आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव |
|---|---|
| 01. | Microtop Infotech Pvt. Ltd., Nashik |
| 02. | Wireworks Systems & Solution (I) Pvt. Ltd., Pune |
| 03. | Atharva Media Concept, Nashik |
| 04. | Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik |
| 05. | Pinak Computer, Nashik |

उपरोक्तप्रमाणे, एकुण ०५ सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| 01. | Microtop Infotech Pvt. Ltd., Nashik | 36,43,507.00 | अनुपस्थित |
| 02. | Wireworks Systems & Solution (I) Pvt. Ltd., Pune | 36,85,001.87 | 24,62,521.87 |
| 03. | Atharva Media Concept, Nashik | 8,49,000.00 | अनुपस्थित |
| 04. | Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik | 7,60,418.00 | 7,25,000.00 |
| 05. | Pinak Computer, Nashik | 8,24,000.00 | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik यांची निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**विषय नं.११** **श्रीसाईबाबा रुग्णालयात न्युरो ओ.टी जी.आय.सी.यु साठी मशिनरी/उपकरणे फर्निचर तसेच कार्डीयाक इन्स्टूमेंट व साईनाथ रुग्णालयासाठी सर्जिकल इन्स्टूमेंट खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा (Commercial Bid)उघडणेबाबत**

**निर्णय क्र.३३०** श्रीसाईबाबा रुग्णालयात न्यूरो ओ.टी., जी.आय.सी.यू.साठी मशिनरी / उपकरणे, फर्निचर तसेच कार्डीयाक इन्स्टुमेंट व साईनाथ रुग्णालयासाठी सर्जिकल इन्स्टुमेंट खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| अ.नं. | तपशील | अंदाजे खर्च | मा.व्यवस्थापन समिती / मा. उपसमिती सभा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा रुग्णालयात न्यूरो पेंशटसाठी नवीन न्युरो आ.सी.यू. व सेंट्रल एअर कंडिशनिंगसाठी तसेच मशिनरी / उपकरणे / फर्निचर खरेदी बाबत. | ९७,०१,६००/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५५१ अन्वये |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | न्युरो सर्जरीच्या ऑपरेशन थिएटरसाठी मशिनरी / उपकरणे खरेदीबाबत. | ३२,९८,३४०/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५४८ अन्वये |
| ०३ | श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन आ.सी.यू.विभागासाठी मॉनिटर्स, व्हेंटीलेटर, सिरींज पंप इत्यादी खरेदीबाबत. | १,९२,००,०००/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५५० अन्वये |
| ०४ | एम.आर.आय. विभागासाठी Magnitude Multi Parameter Monitor खरेदी बाबत. | २६,२०,०००/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५५२ अन्वये |
| ०५ | Tee Probe Instrument खरेदीबाबत. | २३,६२,२००/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५५३ अन्वये |
| ०६ | कार्डियाक ऑपरेशनसाठी अतिरिक्त दोन इन्स्ट्रूमेंट सेट खरेदीबाबत. | १५,७०,३९८/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५५४ अन्वये |
| ०७ | श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सर्जिकल इन्स्ट्रूमेंट व फर्निचर खरेदी बाबत. | ३१,५०,०००/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५४९ अन्वये |

त्यानुसार उपरोक्त सर्व प्रकारच्या मशिनरी / उपकरणे / फर्निचर तसेच कार्डीयाक इन्स्ट्रुमेंट व साईनाथ रुग्णालयासाठी सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी एकत्रितपणे जाहीरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले होते त्यास अनुसरुन सकाळ- पुणे (टुडे), टाइम्स ऑफ इंडीया - मुंबई, लोकमत - औरंगाबाद, अकोला, नागपुर इंडीयन एक्सप्रेस- पुणे, दै.गावकरी - नाशिक या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.२४/०९/२००७ ते दि.०८/१०/२००७ अखेर संस्थानच्या शिर्डी व मुंबई कार्यालयात A- Group Tender करीता ६० व B- Group Tender करीता ३० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.१०/१०/२००७ अखेर ठेवण्यात आली होती. त्यापैकी A- Group Tender करीता आलेल्या ४२ व B- Group Tender करीता ९ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

**A- Tender for Machinery / Equipments / Hospital Furniture**

| Sr.No | Name | Sr.No | Name |
|---|---|---|---|
| 01 | K.B.Electronics, Mumbai. | 22 | Hospitech, Mumbai |
| 02 | Surgiplus, Cuttack , State - Orissa | 23 | Emco Meditek Pvt. Ltd., Mumbai. |
| 03 | Janak healthcare Pvt.Ltd.,Mumbai. | 24 | Emergent Medi-Tech (India) Pvt.Ltd.,Mumbai. |
| 04 | Ion Bio Medicare Pvt. Ltd., Mumbai | 25 | Summit Healthcare Pvt. Ltd., Mumbai |
| 05 | Prabha Surgicals, Mumbai. | 26 | Summit Healthcare Pvt. Ltd., Mumbai |
| 06 | Vishal Surgical Equipment Co. Pvt, Ltd, Mumbai. | 27 | Hi-Tech Surgical Systems, Mumbai |
| 07 | Care Mediquip, Mumbai. | 28 | Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai. |
| 08 | Jaya Enterprises, Latur. | 29 | Cyronics Instruments Pvt, Ltd., Pune |
| 09 | Maestros Mediline Systems Ltd., Mumbai | 30 | Biomedicon Sys., Mumbai |
| 10 | Tulip Electromedicals India Pvt., Pune. | 31 | B.Braun Medical (I) Pvt.Ltd., Mumbai |
| 11 | Simtek Medico Systems Pvt. Ltd., Mumbai | 32 | Meditronics Co.Pvt. Ltd., Mumbai |
| 12 | Atlantic Pharmaceuticals, Mumbai | 33 | B.L. Life Sciences, New Delhi |
| 13 | Aarem Electronics Pvt.Ltd., Pune. | 34 | Shri Hospital Equipments, Ichalkaranji |
| 14 | Recorders & Medicare Systems (P) Ltd., Baddi. | 35 | Hitra Equipments, Mumbai |
| 15 | Elite Healthcare (India) Pvt.Ltd., New Delhi. | 36 | Plenum Technologies Pvt. Ltd., Nagpur |
| 16 | BPL Limited, Mumbai. | 37 | Aditi Enterprises, Nashik. |
| 17 | Philips Electronics India.Ltd., Mumbai. | 38 | Purnima Surgical, Nashik |
| 18 | Schiller Healthcare Pvt,Ltd., Pune. | 39 | Tejas Electronics, Ahmednagar. |
| 19 | Allwin Lifecare, Mumbai | 40 | Kanchan drugs, Pune |
| 20 | Advanced Micronic Devices Ltd., Mumbai. | 41 | Excel Corporation, Nashik. |
| 21 | Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. | 42 | Erkadi Systems, Bangalor |

**B - Tender for Surgical Instruments :-**

| Sr.No | Name |
|---|---|
| 01 | Zenith Surgical Co., Mumbai. |
| 02 | Chimco Bio-medical Engineering Company, Mumbai. |
| 03 | Kalelkar Surgicals Industries, Mumbai. |
| 04 | Om Surgical, Mumbai. |
| 05 | Biomedicon Sys., Mumbai. |

| | |
|---|---|
| **06** | B.L.Lifesciences Pvt.Ltd., New Delhi. |
| **07** | Kanchan drugs, Pune. |
| **08** | Yoga Enterprises, Pune. |
| **09** | Shree Ortho Tools, Nashik. |

सदर खरेदीच्या तांत्रिक निविदा (Technical Bid) दि.१३ जानेवारी २००८ चे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या असून त्यांचा तक्ता तयार करुन तो दि.१६ फेब्रुवारी २००८ रोजी तज्ञ समितीचे सदस्य डॉ.बापु कांडेकर ,डॉ.सुभाष आगाशे , डॉ.कटारीया यांना दाखवुन त्यांची शिफारस घेण्यात आलेली आहे. तरी सदर खरेदीसाठी Commercial Bid उघडवयाच्या आहे.

उपरोक्त निविदापैकी (1) Kanchan drugs, Pune (for Machinery) (2) Tejas Electronics, Ahmednagar (3)Surgiplus,Cuttack, State – Orissa (4) Purnima Surgical, Nashik (5) Yoga Enterprises, Pune.(6) Kanchan drugs, Pune (for Instrument) यांनी Technical Bid सोबत Commercial Bid देखील दिलेल्या आहेत.

उर्वरित ४६ निविदाधारकांचे Commercial Bid आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यांना उपसमितीचे/व्यवस्थापन समितीचे सभेपूढे बोलावून चर्चा/वाटाघाटी करुन खरेदीबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१२** **आर्थोपेडिक इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.३३१** श्रीसाईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक विभागातील मानद व कायमस्वरुपी आर्थोपेडीक तज्ञ डॉक्टरांनी दि. ०३/१०/२००७ चे पत्रान्वये रुग्णालयामध्ये वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेकामी काही आर्थोपेडीक इन्स्ट्रुमेंट सेटची मागणी केलेली आहे. त्यानुसार आर्थोपेडीक इन्स्ट्रुमेंट सेट विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीकामीचा रु. २०,००,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.१०/०१/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

सदरचे सभेतील मंजुरीनुसार उपरोक्त खरेदीकामी संस्थानचे विहीत पध्दतीने दैनिक महाराष्ट्र टाईम्स - मुंबई आवृत्ती, लोकमत - नाशिक आवृत्ती, इंडीयन एक्सप्रेस - पुणे आवृत्ती इत्यादी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार दि.०३/०३/२००८ ते १८/०३/२००८ अखेर संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात ६ व मुंबई येथील कार्यालयात १४ निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०३/२००८ अखेर ठेवण्यात आलेली होती.

सदरच्या जाहिरातीस अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात २ निविदांची विक्री झालेली आहे, तर मुंबई कार्यालयात ०६ निविदांची विक्री झालेली आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०३ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| | |
|---|---|
| 01. | M/s. Meher Distributors Pvt. Ltd., Mumbai |
| 02. | M/s. Inor Orthopedics, Mumbai |
| 03. | M/s. Manman, Pune |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद तांत्रिक निविदा (Technical Bid) आजचे सभेत उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर बाहेरील तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन निविदासादरकर्त्यांना व्यवस्थापन समितीचे सभेपूढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१३** **श्रीसाईबाबा हॉस्पिटल न्यूरो आय.सी.सी.यु.चे एअर कंडिशनिंग कामाकरिता प्राप्त झालेल्या (Commercial Bid) उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.३३२** श्री साईबाबा रुग्णालयात न्युरो सर्जरीसाठी नविन अद्ययावत शस्त्रक्रिया गृह तयार करणेचे काम पुर्ण ले आहे. शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णांचे उपचारासाठी अद्ययावत आय.सी.यु. विभाग तयार करावयाचा आहे. सदरचा विभाग हा न्युरो सर्जरीच्या शस्त्रक्रिया गृहासमोर असलेल्या वार्ड मध्ये बनवायचा आहे. सदरचे आय.सी.यु. तयार करणेसाठी सेंट्रल एअर कडींशनिंग, ऑक्सिजन व्हॅक्यूम पॉईट, फॉल सिलिंग, इपोक्सी कोटींग इत्यादी कामे करावी लागणार आहे. सदर कामाचा अंदाजे खर्च रु.१५,००,०००/- चा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यास निर्णय क्रमांक ५५१ अन्वये विहित पध्दतीने जाहिरात देऊन निविदा मागवून काम करण्यास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार एअर कडींशनिंग व फॉल सिलिंगचे कामाकरीता दैनिक सकाळ- पुणे (टुडे), दैनिक लोकमत - मुंबई, दैनिक गावकरी - नाशिक, दैनिक लोकसत्ता - पुणे या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१४/१२/२००७ ते दि.२७/१२/२००७ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ८ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२९/१२/२००७ अखेर ठेवण्यात आली होती. शिर्डी येथील कार्यालयात ७ निविदांची विक्री झालेली आहे, तर मुंबई येथील कार्यालयात देखील ७ निविदांची विक्री झाली आहे. त्यास अनुसरुन शिर्डी कार्यालयात ५ व मुंबई येथील कार्यालयात ४ अशा एकूण ९ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| 01. | M/s. Airborne Cleanliness Engineers, Mumbai |
| 02. | M/s. Garwa Enterprises, Nashik. |

| | |
|---|---|
| 03. | M/s. Industrial Techno Link, Nashik. |
| 04. | M/s. Vatanucool Engineering Pvt.Ltd., Mumbai. |
| 05. | M/s. Shubham Refrigeration, Nashik. |
| 06. | M/s. Swastik Refrigeration, Nashik. |
| 07. | M/s. Teknow Engineering Services, Mumbai |
| 08. | M/s. V. Cube Engg. Pvt. Ltd.. Pune. |
| 09. | M/s. Vighneshwar Air conditioning Pvt.Ltd., Mumbai. |

उपरोक्त सेंट्रल एअर कडींशनिंगचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा उघडणेकामीच्या दि.२३/०१/२००८ चे टिप्पणी वरील मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशानुसार दि.१६/०२/२००८ रोजी तज्ञ समितीचे सदस्य डॉ. बापू कांडेकर-अहमदनगर, डॉ.वसंत कटारीया-अहमदनगर, डॉ.सुभाष आगाशे-श्रीरामपूर यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

सदर खरेदीच्या तांत्रिक निविदा (Technical Bid) दि.१६/०३/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या असून त्यांचा तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे ०९ सिलबंद निविदा (Commercial Bid) आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. याकामी संस्थानचे नवीन प्रसादालय विभागासाठी तज्ञ सल्लागार श्री.रणदिवे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर श्री.रणदिवे यांचा अभिप्राय घेऊन कार्यवाही करावी. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१४** **श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील मशिनरी/उपकरणे दुरुस्तीकामी लागणाऱ्या Consumable Spare Parts खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा (Commercial Bid) उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.३३३** श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिनरी / उपकरणे दुरुस्तीकामी लागणाऱ्या Consumable Spare Parts खरेदीकामीचा अंदाजे रु. १६,५१,६३०/- चा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२२/०९/२००७ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला होता. त्यानुसार उपरोक्त प्रमाणे खरेदीकामी इंडीयन एक्सप्रेस- पुणे, दैनिक महाराष्ट्र टाईम्स - मुंबई, दैनिक गावकरी - नाशिक या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०५/०२/२००८ ते दि.२०/०२/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ५ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व मुंबई कार्यालयात २० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२२/०२/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. शिर्डी येथील कार्यालयात ५ निविदांची विक्री झालेली आहे, तर मुंबई येथील कार्यालयात देखील ८ निविदांची विक्री झाली आहे. त्यास अनुसरुन शिर्डी कार्यालयात ४ व मुंबई येथील कार्यालयात ६ अशा एकूण १० निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| 01. | M/s. Siddharth Engineering Co., Mumbai |
| 02. | M/s. Excel Services, Mumbai |
| 03. | M/s. United Surgical, Thane |
| 04. | M/s. Cardio Beats, Mumbai |
| 05. | M/s. Chimco Bio-Medical Engineering Co., Mumbai |
| 06. | M/s. Esbee Dynamed Pvt.Ltd., Mumbai |
| 07. | M/s. Saitrons Medical Equipments, Loni |
| 08. | M/s. Adroit Medical System & Services, Mumbai |
| 09. | M/s. Devi Surgical, Ahmednagar |
| 10. | M/s. M. Shah & Co., Pune |

सदर खरेदीच्या तांत्रिक निविदा (Technical Bid) दि.१६/०३/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या असून त्यांचा तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे १० सिलबंद निविदा (Commercial Bid) आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निविदासादरकर्त्यांना व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१५** **श्रीसाईनाथ रुग्णालयाकरीता कार्यालयीन फर्निचर खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत**

**निर्णय क्र.३३४** श्रीसाईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड, कॅबीन व प्रशासकिय कार्यालय इत्यादी ठिकाणी रेकॉर्डस्, मशिनरी, इन्स्ट्रुमेंट्स्, सर्जीकल साहित्य इत्यादी ठेवणेकामी कपाटे व कार्यालयीन कामासाठी टेबलची श्री साईनाथ रुग्णालयाने त्यांचे डि. पी. क्रमांक ८००१ दि.०७/०१/२००८ अन्वये कळविले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशील | मागणी | अंदाजे किंमत | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | कपाट साईज : 1981mm x 914mm x 483mm | ७५ नग | ७०००.०० | ५२५०००.०० |
| २ | लोखंडी टेबल दोन्ही बाजूस ड्रावर असलेला सनमाईका टॉप साईज : 1370mm L x 675mm W x 750mm H | २५ नग | ६५००.०० | १६२५००.०० |
| | | | **एकुण -** | **६८७५००.००** |

उपरोक्तप्रमाणे कार्यालयीन फर्नीचर खरेदीकामीचा अंदाजे रु. ६,८७,५००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि. २४/०२/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०२/२००८ निर्णय क्र. १८० अन्वये सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी दैनिक सामना - पुणे, इंडीयन एक्सप्रेस - मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१८/०३/२००८ ते दि.०२/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ५ व मुंबई कार्यालयात १० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.०४/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०५ बंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत-

| | |
|---|---|
| 01. | M/s. Rijhumal Thakurdas Karachiwala, Ahmednagar |
| 02. | M/s. Sai Enterprises, Shrirampur |
| 03. | M/s. Seva Finvest (I) Pvt.Ltd., Nashik |
| 04. | M/s. Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune |
| 05. | M/s. Magnum Office - Aids, Mumbai |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या.या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निविदासादरकर्त्यांना नमून्यासह व्यवस्थापन समितीचे सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१६** **ऑन लाईन देणगी स्विकारणेसाठी HDFC बँकेचा पेमेंट गेटवे घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३३५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.१७** **संस्थानला प्राप्त झालेल्या मौल्यवान खड्यांचे (Stones)मुल्यांकनाबाबत**

**निर्णय क्र.३३६** श्रीसाईभक्तांकडून देणगीरुपात स्वतंत्रपणे अथवा सोने-चांदीचे अलंकार - वस्तूसह मौल्यवान खडे संस्थान व्यवस्थापनाकडे साठलेले होते. अशा साठलेल्या सर्व खडयांचे ( Stones ) मुल्यांकन (Off Set Value) करुन घेणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १४२ नुसार आयकर / अबकारी विभागाकडून मान्यता प्राप्त असलेले तज्ञ मुल्यांकांनकार नेमून किमान दोन सदस्यांचे उपस्थितीत मुल्यांकन (Off Set Value) करुन घेण्यात यावे, असा निर्णय झालेला होता. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक०४ फेब्रुवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १० नूसार, याकामी मा. उपाध्यक्ष महोदय यांचे मार्गदर्शन घेऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा, असा निर्णय झालेला होता. वरील निर्णयानूसार सोने-चांदी - वस्तु अलंकाराचे टंच काढणे व खडयाचे मुल्यांकनासाठी (Off Set Value) शासकीय मान्यता प्राप्त संस्थाची यादी मागविण्यात / प्राप्त करुन घेण्यात आलेली होती. सदर यादीतुन मा.उपाध्यक्ष महोदय तसेच मा.विश्वस्त के.सी.पाण्डैय यांनी निवड यादी तयार केली, सदर यादीनूसार, मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने मे. हिरो कालरा जेम्स ज्वेलर्स, पुणे, गिरीधर आडगांवकर, नासिक या शासनमान्य मुल्यांकनकाराची याकामी नेमणुक करण्यात आलेली आहे.

नेमणुक केलेले मुल्यांकनकार व संस्थान नियुक्त मुल्यांकनकार मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड यांचे कडून दिनांक २० मार्च, २००८ ते २१ मार्च, २००८ अखेर संस्थानचे स्टॉंग रुम मध्ये सिलबंद पिशव्यात ठेवलेले खडे सर्वासमक्ष उघडण्यात येऊन त्यांचे वेगवेगळया मशिन्स मध्ये पाहणी/ पडताळणी करुन एकमताने संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक, पुर्व लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक यांचे प्रतिनिधींचे उपस्थितीत मुल्यांकन करुन घेण्यात आले आहे.

उपरोक्त शासनमान्य मुल्यांकनकाराकडून १ एप्रिल,२००७ ते ३१ मार्च,२००८ पर्यतच्या कालावधीत प्राप्त झालेले तथा संचित असलेले खडयांचे ( Stones ) मुल्यांकन करुन घेण्यात आलेले असून त्याचे एकूण मुल्य रुपये २२,४३,९७२/- मात्र इतके झालेले आहे. वरील खडयापैकी ज्यांचे मुल्य रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार ) मात्र व त्यापुढे आहे अशा सर्व खडयांच्या स्वंतत्र पिशव्या (पुडया) करुन श्री दिनेश कालरा, मे. हिरो जेम्स ज्वेलरी, पुणे यांचे सहीने सिलंबद करण्यात येऊन, त्यासह इतर सर्व मुल्यांकन केलेले खडे सर्वांसमक्ष सिलकरुन त्याच दिवशी स्ट्रॅाग रुममध्ये ठेवण्यात आले आहेत. तसेच रजिस्टर प्रमाणे मुल्यांकन केलेल्या खडयांची यादी तयार करण्यात आलेली आहे. तरी याबाबत खालील मुद्यांवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**(अ)** मुल्यांकन केलेल्या सर्व मौल्यवान खडयांच्या (Stones) मुल्यांकित यादी सोबत अवलोनार्थ सादर केलेली आहे. सदरचे यादीप्रमाणे मुल्यांकन केलेल्या खडयांचे मुल्य संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक, पुर्व लेखापरिक्षक यांचे सल्याने संस्थानचे लेख्यावर घेण्यास तसेच सदरहु खडयांबाबत पुढील कार्यवाही करणे.

**(ब)** संस्थानने नियुक्त केलेले मुल्यांकनकार अनुक्रमे (१) श्री. दिनेश कालरा, पुणे (२) श्री. आडगावकर, नासिक (३) श्री.कमलाकर खरोटे, मनमाड यांनी दिनांक २० मार्च, २००८ ते २१ मार्च, २००८ असे एकुण दोन दिवस मुल्यांकनाचे कामकाज केलेले आहे. मागील वर्षाप्रमाणेच याकामी

मुल्यांकनकारांनी शिर्डी येथे येऊन सेवा दिलेल्या आहेत. त्यांना रक्कम रुपये ७०००/- मात्र प्रत्येकी मानधन तसेच संस्थान नियुक्त ज्वेलर्स श्री.रघुनाथ नागरे हे देखील प्रत्यक्ष कामकाजाच्या वेळी उपस्थित असल्याने त्यांनाही रक्कम रु.२०००/- मात्र मानधन देण्यात यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त **"अ"** व **"ब"** प्रस्तावास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१८** **संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देणेबाबत.**

**निर्णय क्र.३३७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.१९** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील बायोकेमिस्ट, ई.सी.जी. टेक्निशियन,परिचारीका (बी.एस्ससी), एम.आर.आय. टेक्निशियन यांचे वेतनश्रेणीबाबत**

**निर्णय क्र.३३८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२०** **श्रीसाईनाथ हॉस्पिटलकडील विविध पदावरील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देणेबाबत**

**निर्णय क्र.३३९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२१** **प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदनाम व वेतनश्रेणीबाबत.**

**निर्णय क्र.३४०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२२** **हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल स्टाफ मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.३४१** मा.सचिव विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी/वैद्यकिय अधिकारी यांचे वेतनश्रेणीनिहाय आकृतीबंधास मान्यता मिळाण्याचे अधिन राहून श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे वैद्यकिय अधिकारी /पॅरामेडीकल व इतर कर्मचारी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. सदर कर्मचारी /वैद्यकिय अधिकारी यांचे नेमणूकाची मुदत तसेच मुदतवाढ खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे तारखेस संपत आहे. आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळालेली आहे. संबंधीत कर्मचारी/ वैद्यकिय अधिकारी यांना देण्यात आलेल्या नेमणूकीचे/ मुदतवाढीचे कालावधीमध्ये त्यांचे काम वर्तणूकीबाबत व हुकूमाप्रमाणे कामे करतात किंवा कसे ,त्यांना मुदतवाढ द्यावी अगर कसे / त्यांच्या सेवा पुढे चालू ठेवाव्यात अगर कसे याबाबत अहवाल मागविण्यात आला होता. वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी संबंधीताच्याबाबत खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे गोपनीय अहवाल या कार्यालयास पाठविण्यात आलेला आहे.

| अ.नं. | नांव व पदनाम | नेमणूक दिनांक | झालेली सेवा | ०१ वर्ष नेमणूक/मुदतवाढ कालावधी संम्पुष्टात येत असलेची तारीख | वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे अभिप्राय. |
|---|---|---|---|---|---|
| अ-१ | डॉ.टिंगरे काशिनाथ एन मेडीकल डायरेक्टर व न्युरो सर्जन | ०३/०५/२००६ | ०२ वर्ष | ०२/०५/२००८ | सदर उमेदवाराचे काम समाधानकारक असून त्याची वर्तणूकही चांगली आहे. ते हुकूमाप्रमाणे कामे करतात त्यांचे बाबतीत प्रकरण चालू आहे. परंतु त्यांची तांत्रिक चूक आढळून आली नाही. त्यामुळे त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यास हरकत नाही. |
| अ-२ | डॉ. खुराणा संजय महेंद्रलाल अर्थोपॅडीक सर्जन | १७/०४/२००६ | ०२ वर्ष | १६/०४/२००८ | सदर उमेदवाराच्या बाबतीत काही किरकोळ प्रकरणे चालू होती. परंतु त्यांना समज देऊन ती निकाली काढण्यात आली. कामात व वर्तणूकीत सुधारणा झाली आहे. ते हुकूमाप्रमाणे काम करतात त्यामुळे त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यास हरकत नाही. |
| अ-३ | डॉ.न्यायाधीश अशोक अनंत पॅथॉलॉजिस्ट | ०९/०३/२००६ | ०२ वर्ष | ०८/०३/२००८ | सदर उमेदवाराचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू किंवा प्रस्तावीत नाहीत. त्यामुळे त्यांची सेवा पुढे ठेवण्यास हरकत नाही. |
| ब-१. | डॉ. बजाज हरिष हुकूमचंद इंन्टरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट | ०९/०४/२००७ | ०१ वर्ष | ०८/०४/२००८ | सदर उमेदवाराचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हूकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे बाबत काहीही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ब-२ | डॉ. जपे प्रितम बाळासाहेब अर्थोपॅडीक सर्जन | २८/०५/२००७ | ०१ वर्ष | २७/०५/२००८ | सदर उमेदवाराचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हूकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे बाबत काहीही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| क-१ | डॉ. शर्मा दिलीप बाळकृष्ण स्टोअर मॅनेजर | १४/१२/२००५<br>२४/०४/२००६ | ०२ वर्ष | २३/०४/२००८ | सदर उमेदवाराचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हूकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे बाबत काहीही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाहीत. त्यामुळे त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यास हरकत नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क-२ | डॉ. कुलभैय्या शेषराव आर कॅथलॅब टेक्निशियन | ०७/०५/२००६ | ०२ वर्ष | ०६/०५/२००८ | सदर उमेदवाराचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हूकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे बाबत काहीही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाहीत. त्यामुळे त्यांची सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही. |

वैद्यकिय संचालक यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन -

अ)अ-०१, अ-०२, व अ-०३ वरील वैद्यकिय अधिकारी व क-०१, क-२ वरील कर्मचारी यांची संस्थान सेवा त्यांचा कालावधी संपुष्ठात येत असलेल्या तारखेच्या लगत तारखेपासून पुढील आादेश होई पावेतो त्यांना नेमणूकीसदर्भात देण्यात आलेल्या अटी-शर्ती नुसार पुढे चालू ठेवणेंस

ब) **तसेच** ब-०१ , ब-०२ वरील वैद्यकिय अधिकारी यांना नेमणूकी संदर्भात देण्यात आलेल्या आदेशातील अटी-शर्ती नुसार त्यांना उपरोक्त त्यांचे मुदतवाढ कालावधी संपुष्ठात येत असलेल्या तारखेच्या लगत तारखेपासून पुढे ०१ वर्ष वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.२३ हॉस्पिटलकडील वैद्यकिय अधिकारी यांच्या करण्यात आलेल्या नेमणूकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४२** श्री साईबाबा संस्थानचे हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी या पदावर नोकरी मिळणेबाबत डॉ.मंजूशा काळे,राहाता,डॉ. दिपाली गोसावी, औरंगाबाद,डॉ.कृष्णा गिरी, नाशिक, डॉ. प्रशांत पठारे, अहमदनगर यांनी अर्ज केलेले आहेत. संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांच्या वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी यांनी समक्ष मुलाखती घेतलेल्या असून त्यांना संस्थान चे हॉस्पीटलकडे नेमणूका देणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

त्यानुसार संबंधीतांना मा. व्यवस्थापन समितीचे **दि. १६/०३/२००८** रोजीच्या झालेल्या सभेतील निर्णयाचे अधिन राहून खालील दर्शविलेल्या वैद्यकिय अधिकारी यांच्या हॉस्पीटलकडे रिक्त जागी आवश्यकतेनुसार मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य यांचे मान्यतेनुसार तात्पुरत्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| अ. नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन | मा.व्य.समिती सदस्य मान्यता/ शिफारस |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. मंजूषा उत्तमराव काळे,शिरडी, राहाता | एम.बी.बी.एस. (डी. जी.ओ ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/८६५/२००८ दि. २७/०३/२००८ श्री साईनाथ हॉस्पीटल शिरडी | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ ) एकत्रित वेतन प्रतिमहा रु. १७०००/- | मा.उपाध्यक्ष श्री . शंकरराव कोल्हे सो. |
| ०२. | डॉ. दिपाली दत्तात्रय गोसावी नाशिक | एम.बी.बी.एस. अे. एफ.सी.एच | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३१६८/२००८ दि. ०१/०३/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी. | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ )एकत्रित वेतन प्रतिमहा रु. १७०००/- | मा.विश्वस्त डॉ. पी.एल. तिवारी सो |
| ०३. | डॉ. कृष्णा मधुकर गिरी औरंगाबाद | एम.डी. (इंन्टरनल मेडीसीन ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३१६९/२००८ दि. ०१/०३/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी. | फिजीशियन रु.३००००/- एकत्रित वेतन प्रतिमहा | मा.विश्वस्त डॉ. पी.एल. तिवारी सो |
| ०४. | डॉ. प्रशात अण्णासो पठारे अहमदनगर | एम.बी.बी.एस एम.एस.(अर्थो ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३९३७/२००८ दि. १४/०३/२००८ श्री साईनाथ हॉस्पीटल शिरडी. | वैद्यकिय अधिकारी (अर्थोपेडीक)एकत्रित वेतन प्रतिमहा रु. २१०००/- | मा.विश्वस्त श्री. अभंग सो / डॉ.पी.एल.तिवारी |

तरी उपरोक्त अ.नं. ०१ ,०२ वैद्यकिय अधिकारी ( आर.एम.ओ ) तसेच अ.नं. ०३) फिजीशियन, व अ.नं. ०४) वैद्यकिय अधिकारी ( अर्थोपेडीक)यांच्या करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

**विषय नं.२४ श्री.निवृत्ती माधव कांगोणे, मानधन व मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.३४३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२५ श्री.रावसाहेब गंगाराम पवार यांची मौजे कनकुरी येथील गट नं.१२८ येथील क्षेत्र ० हेक्टर ५६।। आर जमीन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३४४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२६ मौजे शहाजापूर ता.कोपरगाव येथे पदयात्री साईभक्तांसाठी पालखी थांबा उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.३४५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२७ शैक्षणिक संकूल परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.३४६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२८ श्री हनुमान मंदिर जिर्णोध्दार करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२९ संस्थानचे गट नं.८०,८५ मधिल श्री साई प्रसादालयाकरीता गट नं.८७,८८ चे उर्वरीत क्षेत्रात पार्कींगची व्यवस्था निर्माण करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३० श्री क्षेत्र पंढरपूर येथे संस्थान मार्फत बांधण्यात येणाऱ्या वारकरी निवासस्थानाबाबत**

**निर्णय क्र.३४९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३१ आरक्षण क्रं.३४ व ३९ मधील घरे व त्यालगतची जागा वगळणेबाबतचा अहवाल.**

**निर्णय क्र.३५०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३२ श्रीसाईनाथ रुग्णालयाकरीता Portable Blood Gas Analyzer मशिन खरेदीबाबत**

**निर्णय क्र.३५१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३३ श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता फर्निचर खरेदीबाबत**

**निर्णय क्र.३५२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३४ मुदतबाह्य औषधे नष्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३५ सन २००८-०९ या वर्षाकरिता वार्षिक औषधे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३५४** श्रीसाईनाथ व साईबाबा रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २००८-२००९ या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब व ब्लड बँक केमीकल्स, क्ष-किरण फिल्म्स, डेंटल मटेरीयल, त्वचा रोग विभाग, होमिओपॅथी औषधे, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब ओ.टी., कार्डीयाक ओ.टी., सि.टी.स्कॅन इत्यादी खरेदीकामी प्रत्येक विभागाचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची सभा दि. २४/०२/२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. तसेच दि.०२/०१/२००८ चे परीपत्रकान्वये वॉर्ड / विभाग प्रमुख यांना एक वर्षासाठी लागणारी मागणी देणेबाबत कळविले होते.

सदर विभागांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी सादर करण्यात आली होती. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव / शिल्लक असलेला औषध साठा यांचा विचार करता मागणी केलेली नाही. तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नविन औषधे, साहित्य इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे अशा प्रकारे सर्व औषधांची मागणी कमी करुन व नविन औषधांचा यादीत समावेश करुन अंतिम तक्ता तयार करण्यात आला आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | सन २००८-२००९ ची मागणी |
|---|---|---|
| १ | गोळया | १६,९४,२७९.२० |
| २ | इंजेक्शन व आय. व्ही. फ्ल्युडस् | १,५१,८४,१५७.८७ |
| ३ | लिक्विड ओरल्स् | ३,१४,८७८.५० |
| ४ | आय, एअर, व नोझल ड्राप्स | ५,०२,४००.९९ |
| ५ | लॅब केमीकल्स | ६३,८२,५२५.५९ |
| ६ | ब्लड बँक केमीकल्स | ३४,०६,५२७.०० |
| ७ | मायक्रोबायोलॉजी केमीकल्स व साहित्य | ३,६०,५१६.६८ |
| ८ | ओ.टी. आणि इतर मटेरीयल | १,२७,२९,९२९.९६ |
| ९ | कॅटगट ॲन्ड सुचर्स (साईबाबा जनरल, न्युरो, ऑप्थॅलमिक ओ.टी.) | ४,३०,२०३.०० |
| १० | कॅटगट ॲन्ड सुचर्स (कार्डीयाक ओ.टी.) | ५३,०१,२०५.७२ |
| ११ | कॅटगट ॲन्ड सुचर्स (साईनाथ ओ.टी.) | २६,९०,२४४.०० |
| १२ | डेंटल मटेरीयल | ७२,९७२.५४ |
| १३ | मलम | १०,४७,४३१.७२ |
| १४ | क्ष-किरण फिल्म्स् | १,१३,५७४.०० |
| १५ | आयुर्वेदीक औषधे | ४,९५,६९५.७० |
| १६ | होमिओपॅथी औषधे | ३२,४४५.०० |
| १७ | कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य व परफ्युजीनीस्ट यांचे साहित्य | ३,४१,७२,५७७.६९ |
| १८ | सि.टी. स्कॅन व एम.आर.आय.विभागासाठी लागणारे फिल्म्स व इतर साहित्य | ७४,६०,०९०.०० |
| १९ | On Consignment Basis Items (Stent / Valve / Balloon / Pacemaker etc) | २,००,००,०००.०० |
| | **एकुण रक्कम रु. -** | **११,२३,९१,६५५.१६** |
| | **पुर्णांकित एकुण रक्कम रु. -** | **११,२३,९१,६५५.००** |

सदरची मागणी तयार करताना -

०१) सदरची मागणी तयार करताना सन २००५-२००६ व सन २००६-२००७ या दोन वर्षाचा खप तर २००७-२००८ या वर्षातील मागील सहा महिन्याचा खप, सध्या औषध भांडारात असलेला औषध साठा त्याचा होणार खप तसेच २००७-२००८ मधील Pending order इत्यादी बाबी विचारात धरुन

मागणी तयार केलेली आहे. साईबाबा रुग्णालय सुरु होऊन दोन वर्ष झालेले आहे. येथे रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढतच आहे. याचा देखील विचार करुन मागणी तयार केलेली आहे.

०२) श्री साईनाथ रुग्णालयातील अंतरुग्ण व बाहयरुग्णांची संख्या खालीलप्रमाणे आहे-

| अ.नं. | तपशिल | सन २००५-२००६ | सन २००६-२००७ | सन २००७-२००८ |
|---|---|---|---|---|
| ०१ | अंतरुग्ण संख्या | ५७७४६ | ५६३९८ | ६४७७१ |
| ०२ | बाहयरुग्ण संख्या | २४०७०० | २४२७९८ | २५३११० |

०३) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, गोळ्या इत्यादीची एकत्रीत मागणी केलेली आहे. त्यामुळे यावर्षी औषधांच्या एकुण मागणीची रक्कम वाढवुन दिसत आहे.

०४) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, मायक्रोबायोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी इत्यादी विभागासाठी लागणारे केमीकल्स यांचा गतवर्षाचा झालेला खप व श्री साईबाबा रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या यांचा विचार करुन मागणी सुचवलेली आहे.

०५) श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक, जनरल ऑपरेशन थिएटर, न्युरो ऑपरेशन थिएटर, ऑप्थॅलमिक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी.स्कॅन, एम. आर. आय., २-डि इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ दोन वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्या शस्त्रक्रियांचा / तपासण्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशिल | सन २००६-२००७ | सन २००७-२००८ |
|---|---|---|---|
| १ | ॲन्जीओग्राफी | १०४२ | २१७७ |
| २ | ॲन्जीओप्लास्टी | २०६ | ५५९ |
| ३ | ह्दयशस्त्रक्रिया | ३०५ | ५८८ |
| ४ | ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया | ३६३ | ३२१ |
| ५ | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | ४५६ | ३९३ |
| ६ | सि.टी.स्कॅन | ३३२८ | ६३५१ |
| ७ | एम. आर. आय. | - | ३३८३ |
| ८ | २ - डि इको | ८२५ | २६६४ |
| ९ | डायलेसीस | ५१७ | १३७३ |
| १० | अंतरुग्ण संख्या | ३९८८ | ९८६४ |
| ११ | बाहयरुग्ण संख्या | ३०९५४ | ६२३०४ |

उपरोक्त माहितीवरुन श्री साईबाबा रुग्णालयात रुग्णांची संख्या हि वाढतीच आहे. यामध्ये ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टी, ह्दयशस्त्रक्रियांचे रुग्णांना लागणारे सर्जीकल साहित्य, औषधे इत्यादी संस्थानतर्फे ठरलेल्या पॅकेजमध्येच पुरवण्यात येतात त्यामध्ये प्रामुख्याने महागडी स्टेन्ट, बलून, डायग्नोस्टीक कॅथेटर, व्हाल्व, सुचर्स मटेरीयल, इंजेक्शन इत्यादींचा समावेश आहे.

०६) दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबीरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, रोडवरील अपघात इ. मुळे वाढणारी गर्दी (उदा. उत्सव, अध्यात्मीक शिबीरे, फिरते वैद्यकिय पथक, पालखी सोहळा)

०७) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून सात ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जीकल साहित्य इत्यादींचा विचार करण्यात आलेला आहे.

०८) विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, डायग्नोस्टीक कॅथेटर्स, बलून, पेसमेकर, कॅनुले इत्यादी महागडी साहित्य हि On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावीत केलेले आहे. ती आपण वापरल्यानंतर बील अदा करत असतो.

औषधांची रक्कम धरतांना गतवर्षातील मंजुर दराने संस्थानने औषधे खरेदी केलेले आहे ते दर केवळ हिशोबासाठी धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदामध्ये प्राप्त होणारे दर ह्या पेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे. गतवर्षी दि.३१/०३/२००८ अखेर औषधे खरेदीवर एकुण रु. ९,२५,७८,४१३/- इतका खर्च झालेला आहे.

औषधे त्वरीत उपलब्ध होणेचे दृष्टीने दर वर्षीप्रमाणे खालीलप्रमाणे पध्दत अवलंबविण्यात यावी असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

१) औषधे खरेदीकामी दरवर्षीप्रमाणे वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन निविदा मागविण्यात याव्यात.

२) औषधे खरेदी करताना विक्रेत्याऐवजी थेट उत्पादक कंपन्यांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांचेकडून औषधे घेण्यात यावीत. नामांकित कंपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

३) दरपत्रक मागवितांना उत्पादक कंपन्यांची अट तशीच ठेऊन सर्व उत्पादक कंपन्याचे अधिकृत वितरक यांचेकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच थेट उत्पादक

कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात येऊन त्यांना जाहिरातीबाबत अवगत करणेत येऊन निविदा भरणेबाबत कळविण्यात यावेत.

४) सर्वच निविदाधारकांना निविदा उघडणेचे वेळेस वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे. जे निविदाधारक वाटाघाटीसाठी हजर राहणार नाहीत त्यांचे मुळ निविदेतील दर अंतिम धरण्यात यावेत.

५) निवडलेल्या सर्व कंपन्यांचे दर सर्वच औषधांकरीता तुलनात्मक दरांसाठी विचारात घेण्यात यावीत परंतु त्यातील नामांकित कंपन्याचे दर स्विकारण्यात यावेत.

६) ज्या औषधांसाठी / साहित्यासाठी उत्पादक कंपन्यांचे दर येणार नाहीत, त्यासाठी विक्रेत्यांकडून प्राप्त झालेल्या दरांमध्ये नामांकित कंपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

७) वाटाघाटीनंतरचा तुलनात्मक दरांचा तक्ता मा. व्यवस्थापन समितीपुढे ठेवून त्याच वेळी पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय घेण्यात यावा.

८) मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरीक्त मागणी करण्याची आवश्यकता भासल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा.व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी.

तसेच Requirement for २००८-२००९ या कॉलममध्ये केलेल्या मागणी नुसार औषधे, केमीकल्स, साहित्य, कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य व परफ्युजीनीस्ट यांचे साहित्य इत्यादी तसेच Stent/Valve / Balloon / Pacemaker इत्यादी On Consignment basis वर खरेदी करण्यास अंदाजे एकुण रु. ११,२३,९१,६५५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे औषधे खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु. ११,२३,९१,६५५/- चे खर्चास व औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. १ ते ८ चे प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.सदरची खरेदी सन २००८-२००९ या वर्षाकरीता औषधे खरेदीकामी मंजुर असलेल्या रु.१२,०६,००,०००/- चे बजेट तरतुदीमधून करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३६ श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता फर्निचर खरेदीकामी येणाऱ्या जादा खर्चास मंजूरी मिळणेबाबत**

**निर्णय क्र.३५५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३७ संस्थान कर्मचारी वैद्यकीय बीलाचा परतावा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३८ ॲल्युमिनियम टिल्टींग टॉवर लॅडर खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.३५७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३९ श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे तळमजल्याचे ओ.पी.डी सेक्शनकरीता रॅम्प तयार करणे बाबत**

**निर्णय क्र.३५८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४० श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील जिन्याचे जवळ लोखंडी दरवाजे बसविणे बाबत**

**निर्णय क्र.३५९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४१ नवीन प्रसादालयाचे इलेक्ट्रीकल कामाचे फायनल बिलाबाबत.**

**निर्णय क्र.३६०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४२ धर्मशाळा विभागाकडील उपहारगृह संस्थानमार्फत चालविणेबाबत.**

**निर्णय क्र.३६१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय न.४३ धर्मशाळा इमारत नं.०१ मध्ये स्वच्छता व भक्तांना गरम पाणी पुरविणेबाबत.**

**निर्णय क्र.३६२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४४ गॅस सिलेंडर्स भरुन घेणेस मंजूरी मिळणेबाबत**

**निर्णय क्र.३६३** संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना अल्पदरात चहा,कॉफी, दुध, बिस्केट मिनरल वॉटर इत्यादींची प्रसादरुपाने विक्री करण्यात येते. चहा, कॉफी, दुध तयार करणेकामी गॅस सिलेंडर एच.पी. कंपनीचा १४.२ कि.ग्रॅम वजनाचा गॅस वापरण्यात येतो. पूर्वी प्रसादालय व कॅन्टीन मिळून एक विभाग होता. सन १९९९ पासून कॅन्टीन विभाग स्वतंत्र झाला तेव्हा पासून प्रसादालय विभागाकडून २० गॅस सिलेंडर्स कॅन्टीन विभागाकडे मिळालेले आहेत. सध्या साईगणेश गॅस एजन्सी,शिर्डी यांचेकडून एच.पी.कंपनीचा १४.२ कि.ग्रॅम वजनाचा गॅस सिलेंडर (सध्याचे प्रचलित दराप्रमाणे) आवयकतेनुसार भरुन घेतले जातात. गर्दीचे काळात व उत्सवात मुख्य कॅन्टीनला एक महिन्यास अंदाजे १४० ते १५० नग गॅस सिलेंडर्स लागतात. तसेच नवीन भक्तनिवास चहा कॅन्टीनला एक महिन्यास ८० ते ९० गॅस सिलेंडर्स लागतात.बिलात होणारी दरवाढ व घट (शासनाचे जी.आर प्रमाणे ) बिले लेखाशाखेमार्फत थेट आदा करण्यात येतात. सध्या घरगुती गॅसचा वापर केला जात आहे.

तरी कॅंटीन करीता गॅस सिलेंडर आवश्यकतेनुसारी वेळोवेळी साईगणेश गॅस एजन्सी,शिर्डी अथवा इतर गॅस एजन्सीकडून शासन जी.आर प्रमाणे घरगुती अथवा कमर्शियल गॅस सिलेंडर्स भरुन

घेणेस व शासनाचे दराप्रमाणे बिले वेळोवेळी आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-कँन्टीन विभागप्रमुख)

**विषय नं.४५** **प्रसादालयातील स्टीम बॉयलर नादुरुस्त होऊन बद पडल्याने तातडीचे स्पेअरपार्ट खरेदीबाबत**

**निर्णय क्र.३६४** प्रसादालयातील दैनंदिन प्रसाद भोजन बनविणेकामी सन १९९९ पासून थर्मेक्स कंपनीचा ४०० किलो प्रति तास क्षमतेचा एल.पी. गॅसवर चालणारा स्टीम बॉयलर बसविलेला आहे. सुरवातीपासून थर्मेक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर्सना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे. त्यानुसार दर दोन महिन्यानंतर बॉयलरची सर्व्हीसींग करण्यात येत आहे. प्रसादालय स्टीम बॉयलरचे दैनंदिन ऑपरेशन व दुरुस्ती देखभाल प्रसादालयाचा टेक्नीकल स्टाफ करत असतो. दिनांक १६.०३.०८ रोजी बॉयलरचा फिडपंप नादुरुस्त होउन बॉयलर बंद पडला असता टेक्नीशियनने पंप दुरुस्त करुन बॉयलर चालू केला होता. तथापि दिं.१७/०३/०८ रोजी ५ वर्षापूर्वी बसविलेली बॉयलर कॉईल पाण्याच्या स्केलमुळे व सततच्या वापरामुळे चोकअप झाली. त्यामुळे कंपनीच्या अधिकृत सर्व्हीस फ्रँचीसला त्वरीत फोन करुन तातडीने टेक्नीशियन पाठविण्यास सांगितले. त्यानूसार त्याचदिवशी रात्रौ टेक्नीशियन आल्यानंतर तात्काळ बॉयलरची पहाणी केली. दुरुस्तीकामी बॉयलर खोलला असता बॉयलरचे खालील स्पेअरपार्ट खराब झाल्याचे आढळून आले. बॉयलर बंद पडल्याने प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन बनविणेचे कामात अडथळा निर्माण होवून भात स्वतंत्र गॅस भट्टीवर कढईमध्ये तयार करणे भाग पडले. त्याचा परिणाम कर्मचा-यांना जादा श्रम होणेवर झाला. सुट्टयांमध्ये वाढणारी अपेक्षित भक्तांची गर्दी व पुढील रामनवमी उत्सवाचा विचार करता विनाविलंब तातडीने बॉयलर दुरुस्त करणे गरजचे होते. त्यानूसार तातडीने स्टीम बॉयलरचे अधिकृत विक्रेते मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून स्पेअरपार्ट मागवून बॉयलर कार्यान्वीत केला आहे. त्याकरीता मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खालील स्पेअरपार्ट तातडीने मागवीणेत आलेले आहेत.

याकामी मशिनरी दुरुस्ती/देखभालचे मंजूर अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,५७,५२४/- मधून रु.५८,३४३/- खर्च केलेली आहे.

| अं. नं. | बीलधारकांचे नांव व बील नं. | स्पेअरपार्ट तपशील | संख्या | दर रु. पै. | रक्कम रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| A. | मॅक्सीथर्म वर्क्स , औरंगाबाद बील नं. SP४५८१ दि.१७.०३.०८ | COIL FOR RX/RXA/03,04 | ०१ | ३६७५०.०० | ३६७५०.०० |
| | | VALVE SEAT ASSEMBLY | ०६ | ३९९.०० | २३९४.०० |
| | | MULTIPORT VALVE ½" FOR SOFTNER | ०१ | ३७००.०० | ३७००.०० |
| | | HOSE METALLIC BRAIDED 3/8"x40"LG | ०१ | १७५.०० | १७५.०० |
| | | HOS METALIC 1" X 1.5 Mtr.Long | ०१ | १७०४ | १७०४.०० |
| | | | एकूण रुपये = | | ४४७२३.०० |
| | | | + M VAT- १२.५% | | ५५९०.३८ |
| | | | + Packing & Forw.३% | | १३४२.०० |
| | | | + Frieght | | ४५००.०० |
| | | | **एकूण रुपये =** | | **५६,१५५.३८** |
| | | | **पुर्णांकीत रुपये =** | | **५६,१५५.००** |
| B. | मॅक्सीथर्म वर्क्स , औरंगाबाद बील नं. MW-०२६ दि.१७.०३.०८ | REFRACTORY CEMENT | ५० | ३०.०० | १५००.०० |
| | | | + M VAT- १२.५% | | १८७.५० |
| | | | + Frieght | | ५००.०० |
| | | | **एकूण रुपये =** | | **२१८७.५०** |
| | | | **पुर्णांकीत रुपये =** | | **२१८८.००** |
| | | | **एकूण रुपये A+B =** | | **५८३४३.००** |

उपरोक्त प्रमाणे तातडीची गरज म्हणून थर्मेक्स कंपनीचे अधिकृत विक्रेते मॅक्सीथर्म वर्क्स , औरंगाबाद यांचेकडून स्पेअरपार्ट खरेदी करुन स्टीम बॉयलर कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. त्याकामी रु.५८,३४३/- ची रक्कम आदा करण्यात आलेली आहे.

तरी वरीलप्रमाणे स्पेअरपार्ट खरेदीस व त्यासाठी झालेले रु.५८३४३/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग)

**विषय नं.४६** **विदेश संचार निगम लि यांचे नावात टाटा कम्युनिकेशन लिमिटेड असा बदल झालेबाबत**

**निर्णय क्र.३६५** **(अ)** व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.१०.२००६ चे सभेतील निर्णय क्र.८५६ नुसार संस्थानचे वेबसाईटवर इंटरनेटव्दारे ऑनलाईन दर्शन तसेच संदर्भ क्रमांक ०२ चे निर्णयानुसार टि.व्ही. वर श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधा विदेश संचार निगम लि., मुंबई (VSNL, Mumbai) यांचेमार्फत सुरु करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन, विदेश संचार निगम लि.,

मुंबई (VSNL, Mumbai) यांचेशी स्वतंत्र करारनामे करण्यात आलेले आहे. करारनाम्यानुसार सदर दोन्ही सुविधा त्यांचेमार्फत सुरु करण्यात आलेल्या आहेत.

**(ब)** विदेश संचार निगम लि., मुंबई (VSNL, Mumbai) यांनी त्यांचे दिनांक १९ फेब्रुवारी, २००८ रोजीचे (संस्थान आवक नंबर ७१५६ दिनांक ०१ मार्च, २००८) विदेश संचार निगम लि., मुंबई (VSNL, Mumbai) या नावात बदल होऊन, टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड असे नाव करण्यात आलेबाबत कळविलेले आहे.

तरी वेबसाईटवर ऑनलाईन दर्शन व टि.व्ही. वर श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेबाबत वेळोवेळी येणाऱ्या अडचणी सोडविणेसाठी व्हीएसएनएल, मुंबई यांचेशी वेळोवेळी पत्रव्यवहार करावा लागतो. तसेच संस्थानला मिळणाऱ्या रॉयल्टीबाबतही त्यांचेशी पत्रव्यवहार करावा लागतो. सदर पत्रव्यवहार हा विदेश संचार निगम लि., मुंबई (VSNL, Mumbai) यांचे नवीन नावाने म्हणजे टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड या नवीन नावाने करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**विषय नं.४७ संगणक संच व इतर साहित्य खरेदी करणेबाबत**

**निर्णय क्र.३६६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४८ पाळीव प्राणी घोड्याबाबत**

**निर्णय क्र.३६७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४९ शैक्षणिक संकुलातील खेळाडूंकरिता ३५ सिटर्स व्हॅन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५० राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींचे शैक्षणिक शुल्क माफ होणेबाबत.**

**निर्णय क्र.३६९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५१ श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील नियमावलीमध्ये नविन नियम समाविष्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५२ परिसरातील व स्थानिक ग्रामस्थांना मंदीरात प्रवेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३७१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५३ श्रीदत्त मंदीरातील मार्बलच्या पादुकांवर चांदीच्या पादुका बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.३७२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५४ शिर्डी दर्शन व श्रीसाईबाबा मंदीरातील आरत्या व मंत्रोच्चार व्हि.सी.डी. सुधारीत आवृत्ती निर्मितीबाबत.**

**निर्णय क्र.३७३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५५ श्री साईसत्‌चरित्र पंजाबी भाषेतील संस्थान व्दारे प्रकाशित करणे बाबत**

**निर्णय क्र.३७४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५६ जुनी वाहने जाहिर लिलावाने विक्री व नविन वाहने खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३७५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५७ वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षीका, यांचे वाहन वापराबाबत.**

**निर्णय क्र.३७६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५८ शांतीनिवास दर्शन लाईन पहिल्या माळयासाठी टी.व्ही.खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५९ जुने कॅमेरे कोटेशन पद्धतीने विकणेबाबत.**

**निर्णय क्र.३७८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६० नविन प्रसादालयाकरिता एल.सी.डी. टी.व्ही. खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३७९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६१ सी.सी.टी.व्ही विभागाकडील निकामी झालेले कॅमेरे व इतर साहित्य कोटेशन्सपध्दतीने विक्री करणे बाबत**

**निर्णय क्र.३८०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६२ श्रीसाई भक्तांचे निवासव्यवस्थेकरिता गादी, गादीखोळ,चादर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६३ महत्वाचे/अतिमहत्वाचे व्यक्तिंना देण्यात येत असलेल्या पासेसवर नियंत्रंण ठेवणेबाबत.**

**निर्णय क्र.३८२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६४** **सिक्यूरिटी कन्सल्टंटमार्फत श्रीसाईबाबा संस्थानमध्ये सिक्यूरिटी सिस्टम कार्यान्वीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८३** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २२ सप्टेंबर २००७ रोजी झालेल्या मिटींग मध्ये विषय क्रं.२७ निर्णय क्रं.७७२ अन्वये श्री साईमंदिर व मंदिर परिसर सुरक्षिततेे करीता करावयाच्या विविध उपाययोजना व अत्याधुनिक सुरक्षा साधनाचा वापर या करीता कंसल्टंन्ट म्हणून ट्रायकलर स्विक्युरिटी एजन्सी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर सिक्युरिटी एजन्सीच्या प्रतिनिधीनी श्री. साईमंदिर व मंदिर परिसराची पहाणी करुन सुरक्षतेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांबाबत प्राथमिक रिपोर्ट सादर केलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने खालली गोष्टी सामावेश आहे.

१) साई मंदिर परिसरात आत येण्याकरीता (Entry) गेट नं.१,२ व ४ (।) चा वापर करणे बाहेर जाण्याकरीता (Exit) गेट नं.३,४(।।) व ५ चा वापर करणे .

२) प्रत्येक Entry गेट वर चेंकिग करीता खालील सुरक्षा साधनाचा वापर करणे

(१) D.F.M.D.(Six sensor) =४

(२) बॅग स्कॅन (Explosive Detour)

३) प्रत्येक Entry व Exit गेट मध्ये वाहणे येवू नयेत म्हणून ॲटोमॅटींक व्हीकल बेरीअर्स बसविणे.

४) सी. सी.टी.व्ही. यंत्रणा अपडेट करणे नविन आधुनिक पी. टी.झेड. व डुमकॅमेरे,रेकॉडींग करीता आधुनिक डी.व्ही. आर.सिटींम बसविणे.

५) आधुनिक सुरक्षा साहित्य हाताळणे करीता सुरक्षा अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षीत करणे,

६) मंदिर परिसरातील वाढती गर्दी कमी करण्याच्या दृष्टीने संस्थानची प्रशासकिय कार्यलये बँकांचे ए.टी.एम. सेंटर, रेल्वे बुकींग सेंन्टर इत्यादी मंदिर परिसराबाहेर स्थलांतरीत करणे,

७) भक्तांची वाढती गर्दी लक्षात घेता, जुन्या प्रसादालय परिसरात अथवा मंदिर परिसराच्या पुर्वे कडील मोकळया जागेत नविन दर्शन हॉल तयार करणे.व भक्तांना दर्शनाची वेळ ठरविण्याचे नियोजान करणे.

८) दुसऱ्या टप्प्यात नविन प्रसादालय, संस्थांनची सर्व भक्तनिवास, हॉस्पीटल,कणकुरी तळे इत्यादी ठिकाणची सुरक्षा व्यवस्था तयार करणे.

ट्रायकलर सिक्युरीटी एजन्सीचे प्रतिनिधी कर्नल श्री. सवाणी हे मा.व्यवस्थापन मंडळाच्या मिटींग मध्ये हजर राहून सविस्तर माहिती देणार आहेत.त्या बाबत ट्रायकलर स्विक्युरिटीचे प्रोजेक्ट कंन्सल्टंन श्री. अश्वीनी के.सवानी यांचे बरोबर दिनांक.०९.०४.२००८ रोजी दिनांक १५.०४.२००८ रोजी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मिंटींगसाठी हजर राहून व्यवस्थापन मंडळास प्रोजेक्टची माहिती देणेबाबत श्री सवानी यांचे भ्रमर दुरध्वनी क्रंमाक ०९८१०६६६३५८ वर संरक्षण विभाग लिपीक श्री.विलास कोते यांनी कळविले असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,ट्रायकलर सिक्युरीटी एजन्सीचे प्रतिनिधी कर्नल श्री. सवाणी यांना याकामी व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे सविस्तर माहिती देणेकामी बोलविण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**विषय नं.६५** **श्रीसाई सेवाभावी संस्था,शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर यांना साईबाबा भक्तनिवासस्थान येथे गाळा भाडे तत्वावर मिळणेबाबतचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.३८४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६६** **साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी लि.,शिर्डी यांना स्नानगृह चालविणेचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.३८५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६७** **कार्यक्रमासाठी जागा व इतर सुविधा देणेसाठी धोरण ठरविणेबाबत**

**निर्णय क्र.३८६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६८** **डिजीटल बोर्ड, बॅनर्स इत्यादीचे वार्षिक कोटेशनबाबत**

**निर्णय क्र.३८७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली..

**विषय नं.६९** **श्रीराम कथा ज्ञानयज्ञांचे संयोजनाबाबत**

**निर्णय क्र.३८८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७०** **गर्दीचे नियोजन पालखी दर्शन व्यवस्थेबाबत.**

**निर्णय क्र.३८९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७१** **शिधा सामुग्री मिळणेबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, राहूरी यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.**३९० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७२** **महाराष्ट्र राज्याबाहेरील कर्मचाऱ्यांचे पाल्यांच्या शैक्षणिक फी परताव्याबाबत**

**निर्णय क्र.३९१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय न.७३** **श्रिया नितीन विव्दांस,मुंबई जागतिक मैदानी स्पर्धेसाठी निवड झाल्याने येणाऱ्या खर्चासाठी मदत मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३९२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७४** **शासन निर्देशानुसार तालुकास्तरीय लघू पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालये व तालूका स्तरीय पशुवैद्यकीय दवाखाने यांना आर्थिक मदत देण्याच्या प्रस्तावावर पुनर्विचार होणेबाबत .**

**निर्णय क्र.३९३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७५** **शासन निर्देशानुसार ग्रामपंचायतींना सौर पथदिवे बसविणेकामी आर्थिक मदत देण्याच्या प्रस्तावावर पुनर्विचार होणेबाबत.**

**निर्णय क्र.३९४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७६** **वादळाने नुकसान झालेल्या जिल्हा परिषदेच्या नेवासा व नगर तालूक्यातील शाळांना आर्थिक मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.३९५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७७** **विश्वशांती गुरुकुल आश्रम,केरळी ता.किनवट जि.नांदेड यांना बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.३९६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७८** **स्व.आत्माराम डोंगरचंद शहा सेवा संस्था कोल्हापूर यांना रुग्णालयाचे उभारणीसाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.३९७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७९** **कोपरगांव,पुणतांबा व राहाता शहरांच्या पिण्याचे पाणीपुरवठा योजनेकरीता आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.३९८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८०** **जगदाळे मामा हॉस्पिटल बार्शी, ट्रामा युनिटच्या विकासार्थ आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.३९९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८१** **न.पा.वाडी ता.राहाता यांना पिण्याचे पाण्याची पाईपलाईन व पाण्याची टाकीचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.४००** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८२** **ज्ञानेश्वर महाराज जन्मस्थान, आपेगाव येथे विकास कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४०१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८३** **सत्यसाईबाबा हॉस्पिटल, पंढरपुर यांना बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४०२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८४** **श्रीसाईबाबा मंदीर फलटण, जि.सातारा यांना सांस्कृतिक भवनाच्या बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४०३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८५** **डी.एल.बी.बहुउद्देशीय प्रतिष्ठान, अहमदनगर यांना बुद्धीबळ स्पर्धेस आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४०४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८६** **निमगाव-कोऱ्हाळे,ता.राहाता येथील खंडोबा मंदीराचे जिर्णोद्धारास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४०५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८७** **रोटरी सेवा ट्रस्ट उस्मानाबाद, यांना नेत्र रुग्णालयासाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.४०६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८८** **तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विकास कामासाठी लोकवर्गणीची रक्कम देणेबाबत**

**निर्णय क्र.४०७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **शिर्डी सर्व्हे नं. १०९ मधिल मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थानाची दुरुस्ती व नूतनीकरण कामे करणेबाबत.**

**निर्णय क्र.४०८** मा. कार्यकारी अधिकारी यांचेकरीता संस्थानचे स.नं. १०९ मध्ये सन १९९८ साली निवासस्थान इमारत बांधणेत आलेली आहे. या निवासस्थान इमारती मध्ये तळमजल्यावर किचन, हॉल, बेडरुम , वेटींग रुम व संडास- बाथरुम तसेच पहिल्या मजल्यावर दोन बेडरुम व दोन संडास- बाथरुम आहेत. सदर निवासस्थानाला फ्लोरींग करीता सिरॅमिक टाईल्स बसविणेत आलेल्या आहेत. किचन ओटा ग्रेनाईट मध्ये तयार करणेत आलेला आहे. परंतू फ्लोरींगचे सिरॅमिक टाईल्स, संडास बाथरुमचे सिरॅमिक टाईल्स खराब झालेल्या आहेत. तसेच किचन ओट्याचा ग्रेनाईट तुटला आहे. त्यासाठी नविन व्हीट्रीफाईड टाईल्सची फ्लोरींग व संडास

बाथरुम करीता नविन सिरॅमिक टाईल्स व नविन संडास भांडे बसविणे तसेच नव्याने ग्रेनाईट मध्ये किचन ओटा तयार करणे आवश्यक आहे.

तसेच सदर इमारतीचे रंगकाम जुने झालेले असल्याने आतील व बाहेरील बाजुने व कंम्पाउंड भिंतीला रंगकाम करणे आवश्यक आहे. याकामी सदर इमारतीचे आतील पृष्ठभागास लस्टर पेंट व बाहेरील बाजुने व कंम्पाउंड वॉलला ॲपेक्स पेंटचे रंगकाम करता येईल. तसेच इतर किरकोळ दुरुस्ती मध्ये किचन मध्ये मार्बल रॅक तयार करणे, निवासस्थानाचे पोर्चचे समोरील बाजूस रिनोव्हो प्लास्टर करणे, बाल्कनीचे लोखंडी रेलींग काढून स्टेनलेस स्टिलचे रेलींग करणे ही कामे करणे आवश्यक आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६/०३/२००८ चे सभेत मा. कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानी रंगकाम, जुने फर्निचर पॉलीश करणे, आवश्यक नविन फर्निचर खरेदी करणेस व दुरुस्ती करणेस येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

अ) याकामी रंगकाम करणेसाठी अंदाजे रुपये २,४१,२९९.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

ब) ग्रेनाईट किचन ओटा तयार करणे, व्हीट्रीफाईड टाईल्स फ्लोरींग, सिरॅमिक टाईल्स फ्लोरींग व डॅडो, मार्बल रॅक, स्टेनलेस स्टील रेलींग, रिनोव्हो प्लास्टर, संडास भांडे बसविणे इ. कामे. करणेकरीता अंदाजे रुपये ३,९८,३४०.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

क) तसेच आवश्यक फर्निचर खरेदी करीता अंदाजे रु. १,५०,०००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्तप्रमाणे मा. कार्यकारी अधिकारी निवासस्थानाची दुरुस्ती व नूतनीकरण करणेकामी अंदाजे एकूण रुपये ७,८९,६३९.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा इमारत देखभाल व दुरुस्तीखर्च या अंदाजपत्रकीय तरतूदीतून करता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मा. कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थान इमारतीची दुरुस्ती व नूतनीकरण करणेस येणारे अंदाजे रुपये७,८९,६३९.०० मात्रचे अपेक्षीत खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने मटेरीअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारांमार्फत करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **श्री रामनवमी उत्सव-२००८ भक्तांचे तात्पूरते निवासव्यवस्थेसाठी/ साई पालख्यांसाठी अल्युमिनिअम स्ट्रक्चर/स्ट्रेसेससह वॉटरप्रुफ फॅब्रिक कापडाचे छत व बाजू असलेल्या मंडप उभारणीस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.४०९** **(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीतर्फे सालाबादप्रमाणे यावर्षी दिनांक १२ एप्रिल, २००८ ते दिनांक १४ एप्रिल, २००८ अखेर ०३ दिवस श्री रामनवमी उत्सव साजरा करण्यात आला. श्री रामनवमी उत्सवानिमित्त मुंबई व परिसरासह महाराष्ट्राच्या इतर भागांतून साधारणतः ६० ते ६५ पालख्या हजारो पदयात्री साईभक्तांसह श्री क्षेत्र शिर्डी येथे आलेल्या होत्या. तसेच देशाच्या विविध भागातून श्री रामनवमी उत्सवानिमित्त हजारो साईभक्त श्री साईंचे दर्शनासाठी श्री क्षेत्र शिर्डी येथे आलेले होते. अशा वेळेस संस्थानकडे उपलब्ध असलेल्या निवास व्यवस्थेसह शिर्डी गांवात उपलब्ध असलेली निवासव्यवस्था ही अपुरी पडत असल्याने, संस्थानमार्फत संस्थान मालकीच्या विविध ठिकाणी / परिसरात तात्पुरते शामियाने / मंडप उभारुन निवास व इतर मुलभूत सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होत्या. याशिवाय पालखी पदयात्री यांचेबरोबर असलेल्या साईंच्या पालख्या ठेवणेसाठी ही संस्थान परिसरात मंडप उभारणी करुन जागा उपलब्ध करुन देण्यांत आलेली होती.

नुकत्याच दिनांक १८ मार्च, २००८ ते दिनांक २८ मार्च, २००८ या सलग सुट्टयांच्या कालावधीत नवी दिल्ली येथील दिपाली डिझाईन्स ॲण्ड एक्झिबीटस् प्रा.लि. यांचेमार्फत सर्व बाजूंनी बंदिस्त असलेला २० मीटर x ३० मीटर या आकाराचे ॲल्युमिनिअम स्ट्रक्चर / स्ट्रसेससह वॉटरप्रुफ फॅब्रिक कापडाचे छत असलेला मंडप भक्तांना तात्पुरती निवास व्यवस्था तसेच भोजन व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. सदरहू वॉटरप्रुफ फॅब्रिक कापडाचे छत असलेले मंडप सर्वसाधारण उंचीपेक्षा उंच असल्याने या मंडपामध्ये हवा खेळती राहणेसाठी फॅन्सची व्यवस्था करणे, प्रकाशासाठी विद्युत व्यवस्था करणे अत्यंत सोयीचा होता. या सर्व बाबींचा विचार करुन, अशाच प्रकारचा २२ मीटर x ६० मीटर आकाराचा मंडप श्री रामवनमी उत्सवात दिनांक ११ एप्रिल, २००८ ते दिनांक १५ एप्रिल, २००८ अखेर पाच दिवसासाठी मा. अध्यक्षसाो. यांचे पूर्व मान्यतेने उभारण्यात आलेला होता.

**(ब)** सदरहू मंडप उभारणीसाठी नवि दिल्ली येथील दिपाली डिझाईन्स ॲण्ड एक्झीबिटस् यांचेकडेस मंडप उभारणीचे दराची चौकशी करण्यात होती. याकामी दिपाली डिझाईन्स ॲण्ड एक्झीबिटस् प्रा.लि., नवि दिल्ली यांनी त्यांचेकडील दिनांक ०५ एप्रिल, २००८ रोजी फॅक्सव्दारे पाठविलेल्या दरपत्रकानुसार ०५ दिवसांचे मंडप उभारणीसाठी, २२ मीटर x ६० मीटर (१३२० चौरस मीटर) या आकाराचे मंडपासाठी रुपये २४०/- प्रति चौरस मीटर हा दर दिलेला होता. त्यांनी दिलेल्या दरानुसार

दिनांक ११ एप्रिल, २००८ ते १५ एप्रिल, २००८ अखेर ०५ (पाच) दिवसांसाठी सदरहू मंडप उभारणी करणेकामी वाहतूक व इतर करांसहित अंदाजित रक्कम रुपये ४,००,९००/- मात्र इतका खर्च कळविलेला होता.

त्यानुसार, उपरोक्तप्रमाणे ॲल्युमिनिअम स्ट्रक्चर / स्ट्रसेसचे वॉटरप्रुफ फॅब्रिक कापडाचे छत असलेला २२ मीटर x ६० मीटर या आकाराचा मंडप श्री रामवनमी उत्सवात दिनांक ११ एप्रिल, २००८ ते १५ एप्रिल, २००८ अखेर ०५ दिवस ( साईनगर मैदानावर ) उभारणेत आलेला होता.

तरी उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेल्या कार्यवाहीस व त्यासाठी करण्यात आलेल्या योग्य त्या सर्वसमावेशक व अनुषंगिक खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **नवीन टायर्स खरेदी करणे बाबत.**
**निर्णय क्र.४१०** दिनांक २०.०१.२००८ चे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१५९ अन्वये वाहन विभागाकडील वापरात असलेलया खालील तपशिलातील वाहनांकरीता सध्याचे टायर खराब झालेने आवश्यक असणारे खरेदी करावयाचे २४ टायर्स ( ट्युब, प्लॅपसह) वेगवेगळ्या कंपनीचे खरेदी न करता फक्त एमआरएफ या एकाच कंपनीचे कोटेशन मागवून खरेदी करण्यात यावेत व याकामी येणाऱ्या रक्कम रुपये १,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

| **अ.नं.** | **वाहन क्रं.** | **वाहन प्रकार / वापर** | **सध्याचे टायर एकूण वापर कि.मी.** | **आवश्यक टायर साईज** | **कंपनी** | **टायर नग** |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एमएच-१७/ एक्स-४ | महिंद्रा स्कॉर्पिओ / कार्यालयीन | ४६,११० | २३५-७०R-१६ रेडियल | ब्रिजस्टोन | ०५ |
| २. | एमएच-१७/ व्ही-१७०१ | टाटा सुमो/ कार्यालयीन | ६५,१४२ | २१५-७५R-१५ रेडियल | ब्रिजस्टोन | ०५ |
| ३. | एमएच-१७/ एच-४०१ | व्हायजर / कार्यालयीन | ६०,१२४ | १७५-R-१४-C रेडियल | ब्रिजस्टोन | ०५ |
| ४. | एमएच-१७/ टी-७१३१ | टाटा४०७ / शववाहिका | ७०,३१८ | ०८-२५-१६ | अपोलो | ०५ |
| ५. | एमएच-१७/ टी-६८०१ | टाटा४०७/ मालवाहतुक | ३५,१०३ | ०८-२५-१६ | अपोलो | ०२ |
| ६. | एमएच-१७/ एच-२८४ | स्वराज ट्रॅक्टर/ मालवाहतुक | ४५१० तास | १३-०६-२८ | अपोलो | ०२ |
| | | | | | **एकुण** | **२४** |

त्यानुसार जा.नं.एसएसएस-वशी-वाहन-४१०३-२००८ दिनांक १८.०३.२००८ अन्वये खालील एमआरएफ कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन्स मागविण्यात आलेली होती.

| अ.न | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | भनसाळी ट्रॅक्टर्स प्रा.लि.कोपरगांव |
| ०२ | जगदिश ॲटोमाबाईल्स,कोपरगाव |
| ०३ | भल्ला टायर्स, श्रीरामपूर |
| ०४ | वाबळे टायर्स,श्रीरामपूर |
| ०५ | राम टायर्स,कोपरगांव |
| ०६ | नरेंद्र टायर्स,कोपरगांव |

उपरोक्तपैकी खालील कोटेशन्सधारकांनी आपली कोटेशन्स सादर केलेली आहेत.

| अ.न | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | भनसाळी ट्रॅक्टर्स प्रा.लि.कोपरगांव |
| ०२ | राम टायर्स,कोपरगांव |
| ०३ | नरेंद्र टायर्स,कोपरगांव |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्सादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | खरेदी करावयचे टायर्सची साईज | भनसाळी ट्रॅक्टर्स प्रा.लि.कोपरगांव | राम टायर्स,कोपरगांव | | नरेंद्र टायर्स,कोपरगांव | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ०१ सेट | ०५सेट | ०१ सेट | ०५सेट |
| ०१ | २३५-७०R-१६ रेडियल | मागणीप्रमाणे नाही | ५६००.०० | २८०००.०० | ४६४०.०० | **<u>२३२००.००</u>** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | २१५-७५R-१५ रेडियल | मागणीप्रमाणे नाही | ३७७५.०० | **१८८७५.००** | ३८४०.०० | १९२००.०० |
| ०३ | १७५-७०R-१४C रेडियल | मागणीप्रमाणे नाही | ३०००.०० | **१५०००.००** | ३४१०.०० | १७०५०.०० |
| ०४ | ०८-२५-१६ | मागणीप्रमाणे नाही | ५९५०.०० | २९७५०.०० | ५८४०.०० | **२९२००.००** |
| | | | ०१ सेट | ०२ सेट | ०१ सेट | ०२ सेट |
| ०५ | ०८-२५-१६ | मागणीप्रमाणे नाही | ६३००.०० | **१२६००.००** | ६४४०.०० | १२८८०.०० |
| ०६ | १३-०६-२८ | मागणीप्रमाणे नाही | ११७५०.०० | **२३५००.००** | ११८८०.०० | २३७६०.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अधोरेखित निम्नतम दर मान्य करण्यात येऊन संबधितांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ डॉ.अमरसिम्हा रेड्डी वैद्यकिय अधिकारी (जनरल सर्जरी) यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४११** डॉ.अमरसिम्हा रेड्डी यांची संस्थान चे श्री साईनाथ हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी (जनरल सर्जरी ) या पदावर जा.नं.एसएसएस/वशी-०१/८६०३/२००६ दि. ०३/०७/२००६ अन्वये प्रथम ०६ महिन्यांसाठी प्रति महा रु. २१०००/- या एकत्रित मानधनावर तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०१/०७/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

उपरोक्त आदेशातील नेमणुकीची मुदत संपल्यानंतर जा.नं.एसएसएस/वशी-०१/३७५/ २००७ दि. १६/०२/२००७ अन्वये दि.०१/०१/२००७ पासून पुढे एक वर्ष वाढविण्यात आलेली मुदतवाढ दि. ३१/१२/२००७ अखेर संपुष्ठात आलेली आहे.

वैद्यकिय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय यांनी "डॉ.अमरसिम्हा रेड्डी यांचे नेमणूकीचा कालावधी दि.३१/१२/२००७ रोजी संपुष्ठात येत आहे. परंतु डॉ. रेड्डी यांचे दि. ०१/०१/२००८ ते २५/०१/२००८ अखेर त्यांच्या सेवेची श्री साईनाथ रुग्णालयास आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांना दि. ०१/०१/२००८ ते २५/०१/२००८ अखेर मानधन आदा करावे लागेल. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

आता. डॉ. अमरसिम्हा रेड्डी वैद्यकिय अधिकारी ( जनरल सर्जरी ) यांनी दि.२६/१२/२००७ रोजी राजीनामाविषयक अर्ज सादर करुन दि.२६/०१/२००८ पासून राजीनामा मंजूर करणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त वैद्यकिय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्राय विचारात घेऊन डॉ. अमरसिम्हा रेड्डी यांची दि.३१/१२/२००७ अखेर संपुष्ठात आलेली मुदत दि.०१/०१/२००८ ते दि.२५/०१/२००८ अखेर वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- अधिक्षक आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५. अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमास शिधा स्वरुपात देण्यात आलेल्या मदतीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.४१२** खाली दर्शविलेल्या ट्रस्टने मा. कार्यकारी अधिकारीसाहेब, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 01. | ह.भ.प.भास्कर सखाराम गोंदकर (सर), अध्यक्ष, श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट, शिर्डी , ता.राहाता, जि.अहमदनगर (अर्ज दि.23/02/2008) | सालाबादप्रमाणे दि.11/03 ते दि.18/03/08 अखेर होणा-या अखंड हरिनाम सप्ताहाचे महा - प्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

उपरोक्त ट्रस्टला यापुर्वी अखंड हरिनाम सप्ताहासाठी शिधास्वरुपात रु.२५,०००/- पर्यंतची मदत केलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे. तथापि यापुर्वी आलेल्या १०-१५ शिधास्वरुपातील प्रकरणांना संस्थानमार्फत शिधा मदत देण्यात आलेली नाही.

शिधा देणेबाबत शासनाने सुचीत केलेनुसार नियमावली तयार करण्यात आलेली असून शासनाचे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली आहे, तथापि अद्यापपावेतो त्यास मान्यता आलेली नाही. तयार केलेल्या नियमावलीत सदरची मदत बसु शकते, असे मत आहे.

उपरोक्त अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रम हा स्थानिक असलेने तसेच नियमावलीत बसत असलेने मा.अध्यक्ष यांचे सुचनेनुसार ह.भ.प.भास्कर सखाराम गोंदकर (सर), अध्यक्ष, श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट, शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांना रु.११,०००/- मात्रचा शिधा देणेत आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६** **श्रीकृष्ण ज्ञानपीठ प्रतिष्ठाण, कोपरगांव यांना आश्रमाचे कामास आर्थिक मदत देणे बाबत.**
**निर्णय क्र.४१३** श्रीकृष्ण ज्ञानपीठ प्रतिष्ठाण, कोपरगांव यांनी त्यांचे प्रतिष्ठाणचे वतीने वृध्दाश्रम, अनाथ आश्रम, इयत्ता १० वी पर्यन्त शिक्षणाची व्यवस्था, धार्मिक शिक्षण, निसर्गोपचार व इतर रोगांसाठी हॉस्पिटल इत्यादी सर्व उपक्रम जास्तीत जास्त कार्यक्षमरित्या व अधिकाअधिक गरजूंना त्याचा लाभ मिळण्यासाठी एक नवीन आश्रम व श्रीकृष्ण मंदिर, शिर्डी - कोपरगांव रस्त्यावर उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच नियोजित आश्रमात श्री साईबाबांना जाणाऱ्या दिंड्या पालख्या यांचेसाठी एक निवासस्थान व इतर सुविधा करुन देण्याचा मानस आहे. तरी या सत्कार्याला आर्थिक मदत करावी अशी विनंती केली आहे. मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरचा प्रस्ताव मिटींगपूढे ठेवण्याचे निर्देश दिलेले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीकृष्ण ज्ञानपीठ प्रतिष्ठाण, कोपरगांव यांना रुपये २५,००,०००/- आर्थिक मदत देण्यात यावी याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

वरील निर्णय क्र ३२० ते ४१३ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर रा.मोरे) | ( शंकरराव गेणूजी कोल्हे) |
| कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) |